बुधवार, 09 नोव्हेंबर 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक -90
आरएनआय : MAH/2021/82566

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 09 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-90 ● RNI : MAH/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5



# नफरत छोडो, भारत जोडो

## भारत जोडो यात्रेच्या स्वागतासाठी टाकळी-नांदेड मार्गावर लोटला जनसागर

आधुनिक केसरी न्यूज

**वन्नाळी (जि. नांदेड) :** भारत जोडो यात्रेच्या महाराष्ट्रातील दुसऱ्या दिवशी किमान ४ ते ५ किलोमोटरपर्यंत गाड्या आणि माणसांची गर्दी दिसत होती. टाकळी नांदेड मार्गावर कित्येक किलोमीटरवर पदयात्रेतील वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. काँग्रेस कार्यकर्ते, लहान मुले मोठ्या कुतूहलाने आपल्या पालकांसमवेत यात्रेत सहभागी झाले होते. राहुलजी गांधी यांच्या नेतृत्वाखालील भारत जोडो यात्रेला पाठींबा देण्यासाठी जनसागर रस्त्यावर उतरला होता.
मंगळवार दिनांक ८ रोजी सकाळी ८.३० वाजता वन्नाळी गुरुद्वारा येथून पदयात्रेला सुरूवात झाली. छोटी मुले, महिला आणि युवा वर्ग मोठया उत्साहात यात्रेत सहभागी झाला होता. वझरगा (अटकळीजवळ) येथे आल्यानंतर साडे नऊ वाजता यात्रेने विश्रांती घेतली. पुन्हा सायंकाळी 4 वाजता खतगाव फाट्यावरून पुन्हा यात्रेला मोठ्या जल्लोषात सुरुवात झाली.
महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातुन मोठ्या संख्येने युवा वर्ग या यात्रेत सामील झाला होता. ३० ते ४५ वयोगटातील तरुणांची संख्या जास्त होती. दुपारच्या कडक ऊन्हात रस्त्यावर आणि रस्त्याच्या आजूबाजूला गर्दी पदयात्रेत सामील होण्याची वाट पाहत होती. ४ वाजून १० मिनिटांनी रस्त्यावर मंदगतीने सरकत असलेल्या गर्दीत राहुलजी गांधी यांचे आगमन झाले आणि गर्दीला जिवंतपणा आला. गर्दी नांदेडच्या दिशेने वेगाने सरकू लागली. रस्ता कमी पडू लागला तेव्हा राहुलजी गांधींच्या बरोबर चालण्यासाठी अनेकजण धावाधाव करत होते. टप्याटप्प्यावर "नफरत छोडो भारत जोडो" घोषणा देत पुरुष आणि महिलांचे छोटे मोठे समूह या गर्दीत सामील होत होते आणि गर्दीचे रूपांतर जनसगरात झाले होते. नजर जाईल तिथे पर्यंत लोकांची गर्दी दिसत होती. खतगाव हायस्कुलचे विद्यार्थी शालेय गणवेशात यात्रेकरूंच्या स्वागतासाठी उभे होते. टाळ्यांच्या कडकडाट करत "वेलकम सर... वेलकम सर" म्हणत काहीसे झुकून अभिवादन करत होते. त्यापुढे नववारी नेसलेल्या विद्यार्थीनी हातात तुलसी आणि घट घेऊन उभ्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा केलेल्या आणि घोड्यावर बसलेल्या तरुण तरुणींची शोभायात्रा सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. त्यापुढे हातात विना, टाळ चिपल्यांचा गजरात "जय जय रामकृष्ण हरी" गाणारी वारकरी भजनी समुदाय मोठ्या जोशात भजन गात होता.
एका मंचावर महाराष्ट्रातील थोर पुरुष, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, अशा थोर पुरुषांच्या वेशभूषेत महाराष्टातील सांस्कृतीचे दर्शन घडवले जात होते. सुमारे ४५ मिनिटे चालून पदयात्रा भोपळ्याच्या टेकडीला आली तेव्हा यात्रेच्या स्वागतासाठी उभ्या असलेल्या मावळ्यांच्या वेशभूषेतील घोडेस्वारांनी लक्ष वेधून घेतले. पदयात्रा जवळ येताच वेगवान घोडेस्वारी करत, "जय भवानी जय शिवाजी" असा त्यांनी जयघोष केला. यात्रा पुढे सरकत असताना हे घोडेस्वार सुद्धा साहसी कसरती करून लक्ष वेधत होते. तर एके ठिकणी सनई डफली आणि ताशाच्या पारंपरिक वाद्यांनी एक वृद्ध वाजंत्री गट सर्वांचे स्वागत करत होता. रस्त्याच्या बाजूला उंचावलेले झेंडे, कटाऊट्स, पोस्टर्स आणि सूर्याच्या प्रतिकृतीमध्ये राहुलजी गांधी यांचे बॅनर्स सर्वत्र दिसत होते.


# ९६ व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी नरेंद्र चपळगावकर

## साहित्य महामंडळाच्या बैठकीत एकमताने निवड; वर्धा येथे ३,४ व ५ फेब्रुवारी २०२३ कालावधीत होणार संमेलन




आधुनिक केसरी न्यूज


**नागपूर : 96 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी नरेंद्र चपळगावकर यांची निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची बैठक आज (8 नोव्हेंबर) वर्धात पार पडली असून याच बैठकीत 96 व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांच्या नावावर शिक्कामोर्तब झाला आहे. ज्येष्ठ लेखक आणि विचारवंत सुरेश द्वादशीवार आणि उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश आणि वैचारिक लेखनासाठी प्रसिद्ध असलेले नरेंद्र चपळगावकर यांच्यामध्ये संमेलनाध्यक्षपदीसाठी चुरस होती. पण आज नरेंद्र चपळगावकर यांची 96 व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर चपळगावकर यांनी प्रतिक्रिया दिली. यावेळी चपळगावकर म्हणले, 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद हा मराठी भाषा मराठी साहित्य यांच्याबद्दल आपले मत मांडण्याची मोठी संधी आहे, असे मी मानतो. ही संधी मला दिल्याबद्दल मी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे आभार मानतो.'**



नरेंद्र चपळगावकर हे वैचारिक लेखन करणारे एक संवेदनशील लेखक आहेत. ते मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे निवृत्त न्यायाधीश असून न्यायाधीश होण्यापूर्वी ते लातूरच्या दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे पहिले प्रमुख होते. नरेंद्र चपळगावकर यांनी संघर्ष आणि शहाणपण, दीपमाळ, आठवणीतले दिवस आणि कायदा आणि माणूस यांसारख्या पुस्तकांचे लेखन केले. पुण्यात जानेवारी 2012 रोजी झालेल्या 13 व्या राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद नरेंद्र चपळगावकर यांनी भूषवले होते. तसेच मार्च 2014 मध्ये झालेल्या 9 व्या जलसाहित्य संमेलनाचे अध्यक्ष देखील चपळगावकर हेच होते. 2011 मध्ये भैरुरतन दमाणी पुरस्काराने चपळगावकर यांना गौरवण्यात आले होते.

**वर्ध्यात पार पडणार साहित्य संमेलन :** यानुसार 96 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन वर्ध्यात घेण्यात यावे असे विदर्भ साहित्य संघाने सुचविले होते . त्या अनुषंगाने 96 वे महामंडळाच्या स्थळ निवड समितीने वर्ध्याला भेट दिली, तिथली मैदान आणि वाहन तळची पाहणी केली . ती योग्य असल्याचे पाहून स्थळ निवड समितीने वर्ध्यात पुढचे साहित्य संमेलन घेण्यात यावे अशी शिफारस केली . त्यानुसार अखिल भारतीय साहित्य महामंडळाने पुढचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन वर्ध्यात घेण्याचे निश्चित केले आहे .

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## सेवाव्रती

आधुनिक केसरी

कार्यक्रमाला मोठमोठया व्यक्तींनी हजेरी लावली होती. खरं तर पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमाला फार कमी लोक उपस्थित राहतात. पण इथे मात्र मोठया संख्येने लोकांची उपस्थिती होती. लोकांचे कुलकर्णी दाम्पत्यावरील प्रेमाचे ते निदर्शक होते. कार्यक्रमाच्या आधी, कार्यक्रमाच्या दरम्यान आणि कार्यक्रमाच्या नंतरही आम्हाला डॉ कुलकर्णी यांच्या सेवाभावी कार्याचे एकेक पदर उलगडत गेले. आजच्या या लेखात त्यांचे हेच कार्य आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न आहे. त्यांचे कार्य हे आज ग्रामीण भागात काम करू इच्छिणाऱ्या सर्वांनाच दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहे. डॉ शशांक आणि डॉ सौ अलका कुलकर्णी. दोघेही १९७८ मध्ये मुंबईहून शहाद्याला आले. मुंबईत ते दोघे उत्तम प्रॅक्टिस करू शकले असते. नाव आणि पैसाही कमावता आला असता. पण संवेदनशील असलेल्या या दोघांनी मुंबईतील इतर डॉक्टरांचे वैद्यकीय जीवन जवळून पाहिले होते. पेशंटबद्दलची आस्था, आपुलकी नष्ट होऊन



केवळ आर्थिक लाभाचा विचार केला जात होता. अशा वेळी बालरोगतज्ज्ञ असलेल्या डॉ अलका आणि जनरल सर्जन असलेले डॉ शशांक यांनी वेगळा निर्णय घेतला. तो निर्णय होता जिथे आपल्या सेवेची खरी गरज लोकांना आहे अशा ठिकाणी जाऊन वैद्यकीय व्यवसाय करण्याचा. खरं तर त्या काळात असा विचार करणे म्हणजे इतर डॉक्टरांच्या मते मूर्खपणा होता. असे करणे म्हणजे सुखाचा जीव दुःखात घालण्यासारखे होते. पण दोघांनीही आपले कम्फर्ट झोन तोडण्याचा निर्णय घेतला होता. तुम्हाला आयुष्याचा विविधरंगी अनुभव घ्यायचा असेल, जीवन समृद्ध करायचे असेल तर कंफर्ट झोन तोडायला हवे हे तत्वज्ञान आपल्या सगळ्यांना बहुतेक करून माहिती असते. पण आपले कंफर्ट झोन म्हणजे सुखाने राहण्याचे ठिकाण, कार्यक्षेत्र सोडून इतरत्र जाण्याची किती जणांची तयारी असते ?

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर झपाट्याने शहरीकरण झाले. ग्रामीण भागातील लोकांचा ओघ नोकरीसाठी शहराकडे वाढला. प्रचंड लोकसंख्येमुळे शहरातील सोयी सुविधांवर ताण यायला लागला.

**(क्रमशः)**

## आनंदी पहाट



### आर्थिक गुंतवणूक करताना सावधानता बाळगावी

आधुनिक केसरी

नव्याने होणाऱ्या परिचयांतून अनेकदा नवनव्या संकल्पना उदयास येऊ लागतात. त्यांतून नवे ग्रुप तयार होतात. त्या ग्रुपच्या माध्यमातून व्यावसायिक चर्चा घडायला सुरुवात होते. प्रत्येकाचा एक सामायिक हेतू असतो, व्यवसायाच्या माध्यमातून अर्थार्जन करणे. त्यांतील एक-दोघे जास्तच हुशार, तयारीचे, पट्टीचे असतात. त्याच्यापुढे आपली तिजोरी उघडी करणाऱ्यांच्या उणिवा त्या हुशारांना कळलेल्या असतात. त्याचाच फायदा घेऊन, खोटा वायदा करून, कायद्याला न जुमानता, भागीदारी तत्वावर आर्थिक व्यवहार सुरु होतात. त्यांच्या दृष्टीकोनातून भागीदारी ह्या शब्दाचा अर्थ नेमका काय आहे, हे इतरांना कालांतराने समजते. त्यांचा भागीदारीचा अर्थ निराळा असतो, त्यांनीच फक्त भागी घ्यायची आणि इतरांना दार दाखवायचे. ह्यामुळे जो मुळांत धनाढ्य आहे तो कंगाल होतो, जो कंगाल आहे तो धनाढ्य होऊन जातो. निरनिराळ्या व्यावसायिक आस्थापना आपल्या स्वतःच्या व्यावसायिक उन्नतीसाठी, वाढीसाठी, वृद्धीसाठी आर्थिक गुंतवणूक करण्याच्या, गुतंवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी जाहिराती करत असतात. अशा जाहिरातींमध्ये कितपत तथ्य असते, नमूद केलेल्या बाबींमध्ये किती सत्य असते, ह्यादृष्टीकोनातून गुंतवणूक करण्याअगोदर अभ्यासपूर्वक विचार, वर्तन आणि व्यवहार करावा. समाज माध्यमातून केल्या जात असलेल्या व्हिडिओ जाहिरातींची तर लगेच भुरळ पडते. अनेक व्यावसायिक, बिल्डर्स, मोठ्या कंपन्या आपल्या व्यवसायांत अगदी नगण्य रक्कम घेऊन शेअर्स, फिक्स्ड डीपॉझिट निरनिराळ्या ठेवींच्या स्कीम्स जाहिरातींच्या माध्यमातून गुंतवणूकदारांना आकर्षित करत असतात. मोठ्ठा परतावा मिळण्याची आमिषे दाखवून कोट्यावधींचा पैसा गोळा करतात आणि मूळ उद्देश बाजूला ठेऊन हाती लागलेला पैसा एकतर वारेमाप उधळतात अथवा त्या पैशाचा गैरवापर, अवैधरीत्या, निरनिराळ्या स्वतःच्या प्रकल्पांमध्ये करायला लागतात. अनेकांच्या अशा व्यवहाराची परिणती कालांतराने फसवणूक, आर्थिक गुन्हेगारी झाल्याचे उघड होते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### तुकोबाची वारी | अभंगात ||

मनाच्या शेजारी | असावा एकांत ||
घेईन निवांत | नाम तुझे ||१||

आत्म्याशी संवाद | साधेल त्रीकाळ ||
नाही ताळमेळ | संसारात ||२||

वाचाळाची वस्ती | साधनेस बाधा ||
फुकाचाच सौदा | दांभिकाशी ||३||

आत्ममग्न होता | मौन लिपी कळे ||
विरक्तीची फळे | नाथ दावी ||४||

समाधिस्थ ज्ञाना | प्रगटे अंतरी ||
तुकोबाची वारी | अभंगात ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरूपण"

आधुनिक केसरी


### तेथे उणे काय राही।

जन्मलो अंबेच्या कुळी। राहतो तिच्या राऊळी।
आम्ही तेथ दीपमाळी। देतो अंबेसी आरोळी।।
सांगावे तुम्हांसी काय। रेणुका आम्हां सांभाळी।।
घेतली अंबेची झोळी। भिक्षेसी पुरणपोळी।।
भिक्षा वाढे अंबाबाई। तेथे ऊणे काय राही।
येता भिक्षा देण्या माई। हास डोळेभरी पाही।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



### मंगलाचरण

आधुनिक केसरी

नमस्कार मित्रांनो, आपण मंगलाचरण या समासाच्या शेवटाकडे आलो आहोत प्रत्येक दशक व प्रत्येक समास आपल्याला जीवनविद्या शिकवून जातो व समर्थाच्या अफाट बुध्दीमत्तेचे आदर व कौतुक वाटते. ऊत्तरार्धात समर्थ सांगतात की "अध्यात्म हा अनुभव घेण्याचा विषय आहे."ज्यांना त्याची तळमळ आहे त्यांनाचं त्याचा अर्थ कळेल. निर्विकारपणे जगत,कुठलेही किंतू परंतू मनात न आणता. जोसाधं पण सरळमार्गी सरधोपट जीवन जगतो जो कुणाचाही द्वेश,मत्सर करत नाही कुणालाही विनाकारण त्रास देत नाही. जो कधीही खोटं बोलत नाही ,चहाडीचुगली करत नाही. जो सतत सन्मानाने व समाजाने घालून दिलेल्या आदर्श जीवन पध्दतीने जगतो. जो चोरी,दरोडे अशी वाईटकर्म करत नाही. समाजातील सर्व थरांतील लोकांशी एकोप्याने वागतो. पद,प्रतिष्ठा, सत्तलोलुपता यांच्या आहारी जात नाही. अशां लोकांना अध्यात्म विषय पटकन कळतो. अभिमानी माणूस वाद वाढवतो समाजामध्ये दुफळी निर्माण करतो. **(क्रमशः)**



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## मनाचे श्लोक

आधुनिक केसरी

**अनाथां दीनांकारणे जन्मताहे ।**
**कलंकी पुढे देव होणार आहे ॥**
**तया वर्णिता शीणली वेदवाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ १२५ ॥**

**सरळ अर्थ :** दीनदुबळ्यांसाठी, अनाथांसाठी देव अवतार घेत असतो. कली युगात पुढे कल्की हा देवाचा अवतार होणार आहे. वेद-पुराणांमध्ये त्याचे सविस्तर वर्णन केलेले आहे. आणि तो भक्तांच्या हिताकडे दुर्लक्ष करणार नाही.

**विवेचन :** महर्षी दुर्वास ऋषींनी राजा अंबरिषाला दिलेला शाप भगवंतानी स्वतःवर घेतला. त्यासाठी भगवंतानी दशावतार घेण्याचे कबूल केले. आजपर्यंत नऊ अवतार होऊन गेले आहेत आणि पुढे कलंकी नावाचा धर्म आणि राजसत्तेची पुनःस्थापना करणारा अवतार होणार आहे. श्रीतुकाराम महाराजांनी कलियुगाचे पुढील प्रमाणे वर्णन केले आहे.

"मागें संतीं होतें जें जें सांगितलें । तें येऊं लागलें अनुभवा ॥१॥ आचारभ्रष्ट होती लोक कली । पुण्य क्षीण बळी जालें पाप ॥२॥ वर्णधर्म कोण न धरी विटाळ । घालिती गोंधळ एके ठायीं ॥३॥ वेदाचे पाठक सेवितील मद्य । न देखती भेद विषयीं भांड ॥४॥ तुका म्हणे किती करावे फजित । तेचि छंद नित्य बहु होती ॥५॥"

(मागे संतानी जे जे काही सांगितले आहे, ते आता प्रत्येक्ष अनुभवला येऊ लागले. कलियुगात लोक सदाचारी न बनता दुराचारी बनतील. पुण्य कमी होऊन पाप वाढत जाईल. चांगल्या वाईटाचा कोणी विचार करणार नाही. सर्वजण एकत्र येऊन दुराचारी बनतील. एका ठिकाणी मिळून सर्व गोंधळ घालतील. वेद पठण करणारे मद्य पदार्थांचे सेवन करतील. चांगला वाईट विचार न करता भांडतील. तुकाराम महाराज म्हणतात त्यांची किती जरी फजिती केली, तरी त्यांचे दुराचारी छंद नित्याने वाढत जातील.)



या श्लोकाच्या तिसऱ्या चरणात म्हटल्याप्रमाणे श्रीमद्‌भागवतपुराणात बाराव्या स्कंदाच्या दुसऱ्या अध्यायात कल्की अवताराबद्दल सविस्तर वर्णन आहे. त्यात सांगितल्याप्रमाणे कलियुगाचा अंत होत असताना सर्वत्र अराजक माजलेले असेल. राज्यकर्ते लुटेरे बनलेले असतील, समाजात नीतिमत्ता ढासळलेली असेल, विवाहात वडीलधाऱ्या माणसांची पसंती, संमती या गोष्टीचे महत्व पार नष्ट झालेले असून केवळ स्त्री पुरुष स्वतःच एकमेकाला बघून विवाह करतील, संस्कारांच्या अभावामुळे अशा विवाहातील पावित्र्य नष्ट झालेले असेल. सामान्यजनाना जंगलात भटकून कंदमुळे, मांस, झाडपाला अशा प्रकारच्या अन्नावर गुजराण करावी लागेल. त्यामुळे माणसे, पशुपक्षी सर्वांचेच आकार लहान आणि आयुष्यमान कमी झालेले असेल. माणसाचे आयुष्यमान फक्त ३० वर्षांचे उरलेले असेल. अशा परिस्थितीतून दीनदुबळ्यांना, अनाथाना वाचवण्यासाठी श्रीविष्णू पुन्हा एकदा पृथ्वीवर अवतार घेतील. त्यांचे नाव कल्की असेल. संभल नावाच्या गावामध्ये विष्णुयश नावाच्या विद्वान, उदार अशा ब्राम्हणाच्या घरी ते जन्म घेतील. देवदत्त या नावाचा त्यांचा पांढऱ्या रंगाचा घोडा असेल आणि हातात तलवार घेऊन ते या घोड्यावर बसून लुटारू राज्यकर्त्यांना मारून पुन्हा पृथ्वीवर सुराज्य निर्माण करतील आणि हळूहळू प्राणिमात्रांची स्थिती पूर्ववत स्वास्थ्यपूर्ण होईल. या कामगिरीमुळे कल्कीला देवत्व मिळून भगवान कल्की या नावाने ते ओळखले जातील. अशा रीतीने देव अनाथांची, दीनदुबळ्यांची 'कुणीतरी आपल्याला अराजकातून, दयनीय परिस्थितीतून सोडवावे' ही अपेक्षा पूर्ण करेल, त्याना निराश करणार नाही.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

चार वेद, अठरा पुराणे, तसेच विविध ग्रंथांमधून भगवंताचे वर्णन केले गेले आहे, तरीही भगवतांचे खऱ्या अर्थाने पुर्ण वर्णन झाले आहे असे म्हणता येत नाही. जो स्वतः अमर्याद आहे, त्याचे यथार्थ वर्णन मर्यादित बुध्दीने करणे शक्य होईल का ? जो स्वतःच अनंत आहे, त्याला शब्द मर्यादेत कसे बंदीस्त ठेवता येईल.

"यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भव- ति भारत| अभ्युत्थान- मधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्- || परित्राणाय- साधूनां विनाशाय च दुष्कृताम्-| धर्मसंस्था- पनार्थाय सम्भवामि युगे युगे|| (गी. ४-७, ८)

(गीतेमध्ये मी भक्तांचे रक्षण करण्यासाठी आज पर्यंत अवतार घेतले आणि पुढेही नित्य अवतार घेईन " असे भगवंताचे वचन आहे.)

आजची सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक परिस्थिती बघितली तर आपल्या सारख्यांना असे वाटत की देवानी अवतार घ्यावा आणि अमंगलाचा समूळ नाश करावा, देशात रामराज्य आणावे. पण त्यासाठी आपण 'भक्त' व्हावयास हवे, कारण देव भक्तासाठी अवतार घेत असतो. आपल्याला एखादा आजार झाला असेल आणि आपल्याला एखाद्या उत्तम ईस्पितळातून उपचार करुन घ्यावयाचे असतील तर तेथे दाखल करून घेण्यासाठी आवश्यक ते सर्व निकष पूर्ण करावे लागतात, तसेच किमान अनामत रक्कम भरावी लागते आणि त्या नंतरच आपल्यावर तेथील डॉक्टर उपचार करतात. इथे भगवंत म्हणतात की तू फक्त भक्त हो, तुझी सर्व जबाबदारी मी घेतो. आपल्या भक्त होण्याचे निकष पूर्ण करायला हवेत. भक्त होण्यासाठी अंगी सात्विकता रुजविणे आवश्यक आहे. सात्विकतेचे बीज नुसते टिकवून चालणार नाही तर ते पुढील पिढीकडे संक्रमित करावे लागेल. शुद्ध बीज असेल तर आणि तरच रसाळ आणि गोमटी फळे मिळतात. त्यासाठी नित्य नामात राहण्याचा आपण प्रयत्न करायला हवा. श्रद्धेची अनामत ठेवायला हवी, म्हणजे भगवंताचा अवतार निश्चित होईल.

**|| जय जय रघुवीर समर्थ ||**



# शिंदे सरकारच्या पाठीशी जनता ठामपणे उभी

## सिल्लोड येथील जाहीर सभेत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी व्यक्त केला विश्वास

आधुनिक केसरी न्यूज

**संदीप मानकर**

**सिल्लोड :** ठाकरे सरकारमध्ये असणारे चाळीस आमदार आणि नऊ मंत्री एकाच वेळेला सत्तेतून बाहेर पडतात म्हणजे ते सरकारच किती कमकुवत होते आणि राज्याचे मुख्यमंत्री पदाचे नेतृत्वच किती कमजोर होते, असा आरोप करत सध्या महाराष्ट्रात नव्याने स्थापन झालेले शिंदे-फडणवीस सरकार हे सर्वसामान्य जनतेच्या हिताचे सरकार आहे, म्हणून आम्हाला सरकार पडण्याची अजिबात भीती नाही. कारण राज्यातील जनता शिंदे सरकारच्या पाठीशी ठामपणे उभी आहे, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुपूत्र खा. श्रीकांत शिंदे यांनी सिल्लोड येथील जाहीर सभेत बोलताना दिला.

सिल्लोड येथील नगर परिषदेच्या अंतर्गत विविध विकासकामांचे भूमिपूजन खा. श्रीकांत शिंदे यांचे शुभहस्ते करण्यात आले. त्यांनतर सायंकाळी नगर परिषद प्रशालेच्या मैदानावर प्रचंड जाहीर सभा घेण्यात आली होती. याप्रसंगी व्यासपीठावर पालकमंत्री तथा रो.ह.यो.मंत्री ना. संदीपान भुमरे, कृषिमंत्री ना.अब्दुल सत्तार, माजी मंत्री अर्जुन खोतकर, आमदार प्रदीप जैस्वाल, आमदार प्रा. रमेश बोरणारे, माजी आमदार तथा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष नितीन पाटील, प्रवक्ते नरेश म्हस्के, जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ, जिल्हाप्रमुख रमेश पवार, जिल्हाप्रमुख भरतसिंग राजपूत, युवासेना कोअर कमिटी सदस्य अभिमन्यू खोतकर, नगराध्यक्षा राजश्री निकम, उपनगराध्यक्ष अब्दुल समीर, नॅशनल सूतगिरणीचे संचालक अब्दुल आमेर, सिल्लोड तालुकाप्रमुख देविदास पा. लोखंडे, सोयगांव तालुकाप्रमुख प्रभाकर काळे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अर्जुन पा.गाढे, कृ.उ.बा.समितीचे उपसभापती नंदकिशोर सहारे, माजी जि.प.अध्यक्ष श्रीराम महाजन, माजी जि.प.उपाध्यक्ष केशवराव तायडे, महिला आघाडीच्या दुर्गाताई पवार, माजी सभापती डॉ.संजय जामकर, युवासेना तालुकाप्रमुख धैर्यशील तायडे, नॅशनल सूतगिरणीचे संचालक मारोती वराडे, दामूआण्णा गव्हाणे आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना खा. श्रीकांत शिंदे म्हणाले की, विरोधकांकडे खोके, गद्दार आणि खंजीर खुपसणे एवढे तीनच शब्द असून तेवढेच आरोप करण्यांवर ते समाधान मानत आहेत मात्र खरी गद्दारी ही स्व. बाळासाहेबांच्या, धर्मवीर आनंद दिघेंच्या विचारांशी आणि मतदारांच्या भावनेशी तुम्ही केलेली आहे. ज्यांवेळी तुमच्या हातात सत्ता होती तेव्हा तुम्हांला कधी घरातून बाहेर देखील पडता आले नाही मात्र आता सत्ता हातातून गेल्यावर तुम्हांला शेतकऱ्याच्या बांधावर जाणे आठवत आहे आणि ही जागा तुम्हांला जनतेने दाखवून दिली. तर आदित्य ठाकरे जेव्हा बांधावर जातील तेव्हा त्यांच्या हातात मकाचे आणि ज्वारीचे कणीस जर दिले तर त्यांतून ज्वारीचे कणीस नेमके कोणते आहे हे सुद्धा त्यांना सांगता येणार नाही असे हे हुशार युवराज आहेत असे सांगून खा. श्रीकांत शिंदे यांनी आदित्य ठाकरेंवर देखील निशाणा साधला. अडीच वर्षे सत्तेत असतानादेखील तुम्ही या राज्याला ना कुठले उद्योग देऊ शकले ना तरुणांच्या हाताला रोजगार देऊ शकले कारण सर्वसामान्यांना रोजगार मिळावा ही भावनाच तुमच्या मनात नव्हती. आणि आता मात्र तीन महिन्यांत दुसरीकडे काही उद्योग गेल्याने तुम्हांला नुकसान वाटत आहे म्हणजे उद्योग वळविणे काय फक्त तीन महिन्यांचे काम असते का? इतकी पोटतिडकी होती तर गेल्या अडीच वर्षातच तुम्ही राज्याला सुजलाम-सुफलाम बनवू शकले असते अशीही टीका त्यांनी ठाकरे सरकारवर केली.

### खबरदार..जर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचेवर आरोप कराल तर

माझ्यावर जाणूनबुजून आरोप होताहेत. कधी खोके घेतल्याचे तर कधी अपशब्द बोलल्याचे राज्यातील सर्व महिला माझ्या माता-भगिनी आहेत, म्हणून मी त्यांच्याबद्दल कधीही अपशब्द वापरु शकत नाही आणि खोकेवरुन आम्हांला कायम मनस्ताप देणाऱ्यांमध्ये आम्हाला विकत घेण्याची सुद्धा हिंमत नाही तरीसुद्धा माझ्यावर आरोप झालेले मी सहन केले. परंतु जर राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचेवर जर आपण आरोप करीत असाल तर खबरदार जशास तसा बदला घेतल्याशिवाय आम्ही राहणार नाही म्हणून आम्हांला तुम्ही एवढेही कमजोर समजू नका असे म्हणून कृषिमंत्री यांनी आपल्या भाषणांत विरोधकांना प्रत्युत्तर दिले.

# रेल्वेतील एसी बंद; ५० हजार भरपाई देण्याचे कोर्टाचे आदेश



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** वातानुकूलित रेल्वे डब्यातील जागेचं आरक्षण केल्यानंतरही रेल्वे प्रवासात एसी बंद असल्याने ग्राहक न्यायालयात धाव घेतलेल्या प्रवाशाला मोठा दिलासा मिळाला आहे. याप्रकरणी रेल्वेने सदर प्रवाशाला ५० हजार रुपये भरपाई म्हणून द्यावेत, असे आदेश मुंबईतील ग्राहक न्यायालयाने दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील फोर्ट परिसरात राहणाऱ्या शिवशंकर शुक्ला यांनी जून २०१७ मध्ये अलाहाबाद-मुंबई या प्रवासासाठी दुरांतो एक्स्प्रेसमध्ये प्रथम वर्ग एसीचे आरक्षण केलं होतं. मात्र रेल्वे गाडीत प्रचंड उकाडा असतानाही एसी बंद होता. त्यामुळे शुक्ला आणि इतर सहप्रवाशांनी रेल्वे प्रशासनाकडे याबाबत तक्रार केली. त्यावर गाडी सुरू होताच एसी सुरू होईल, असं रेल्वेच्या कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात आलं. मात्र नंतर गॅस लीक झाल्याचं कारण सांगत संपूर्ण प्रवासात एसी बंदच ठेवण्यात आला. या सगळ्या प्रकारानंतर मला प्रचंड मानसिक त्रास झाल्याचं सांगत शिवशंकर शुक्ला यांनी थेट ग्राहक न्यायालयात छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर आणि IRCTC यांच्याविरोधात तक्रार दाखल केली. अखेर आता याप्रकरणी ग्राहक न्यायालयाने आपला निर्णय दिला असून मानसिक त्रासासाठी ३५ हजार रुपये आणि खटल्याच्या खर्चाचे १५ हजार रुपये असे एकूण ५० हजार रुपये रेल्वेने शिवशंकर शुक्ला या प्रवाशाला द्यावेत, अशा सूचना न्यायालयाने दिल्या आहेत.

# शिवना नदीत बुडून मुलाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** नितीन गायकवाड राहणार मालेगाव तालुका वैजापूर जिल्हा औरंगाबाद हा मुलगा शिवना नदीमध्ये पोहण्यासाठी गेला असता त्याचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही माहिती औरंगाबाद महानगरपालिका अग्निशमन दलास मिळताच तातडीने घटनास्थळी दाखल होऊन अर्ध्या तासाच्या आत मृतदेह बाहेर काढून पोलिसांच्या ताब्यात दिला. अग्निशमन दलाचे जवान, मुख्य अग्निशमन अधिकारी आर. के. सुरे यांच्या आदेशानुसार उप अग्निशमन आधिकारी डी.डी. साळुंके, अग्निशमन दलाचे पथक ड्युटी ऑफिसर एल. पी. कोल्हे, अग्निशामक सुजित कल्याणकर, मयूर कुमावत, विक्रम भुईगळ, किरण पागोरे, संग्राम मोरे, दिनेश वेलदोडे, अक्षय नागरे, शंकर दुधे आदींनी ही कामगिरी पार पाडली.

# सत्तारांवर कारवाईसाठी दाखवलेली तत्परता गुलाबराव पाटलांच्या वेळी का नाही?

## सुषमा अंधारे यांचा महिला आयोगाला सवाल

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी काल (सोमवारी) राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याबद्दल अपशब्द वापरल्याने राजकीय वातावरण चांगलच तापले होते. राष्ट्रवादी काँग्रेसकडून आक्रमक भूमिका घेण्यात आली व अब्दुल सत्तारांना सुप्रिया सुळे यांची माफी मागण्यासाठी अल्टिमेटम देण्यात आला. शिवाय, सत्तारांची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करावी अशीही मागणी करण्यात आली. याचबरोबर राज्याच्या महिला आयोगानेही सत्तार यांच्यावर कारवाईसाठी कालच पोलीस महासंचालकांना पत्र पाठवले आहे. या पार्श्वभूमीवर आता शिवसेना(ठाकरे गट) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी महिला आयोगाला एक सवाल केला आहे. ज्यावरून विविध चर्चा सुरू झाल्या आहेत. सुषमा अंधारे म्हणतात, मला महिला आयोगालाही अत्यंत नम्रपणे सांगावं वाटतय, की अब्दुल सत्तारांवर तक्रार दाखल होण्यासाठी तुम्ही ज्यावेळी तत्परता दाखवता, ती तत्परता तुम्ही गुलाबराव पाटलांच्या विरोधात तक्रार दाखल करणे किंवा त्यांना नोटीस पाठवणे, यासाठी का दाखवू नये? ती दाखवायला हवी. कारण, सर्व आरोपींची मानसिकता सारखीच आहे. माझ्या दृष्टिकोनातून हे सर्व आरोपीच आहेत आणि सगळे गुन्हेगारच आहेत. कारण, हे महिलांचा सातत्याने अपमान करतात, महिलांना जाणीवपूर्व दुय्यम वागणूक देतात. याशिवाय, एकतर महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोनच वाईट आहे आणि त्यात कोणत्या महिलांबद्दल बोलावे याचा जणू त्यांना परवाना मिळालेला आहे. म्हणजे ठरवून विवक्षित वर्गातील,विवक्षित जात, समुदायातील, विवक्षित विचारधारेच्या, विवक्षित अशा ठराविक महिलांबद्दलच अशी वक्तव्य आणि अशा घटना सातत्याने घडत राहतात. असेही अंधारे म्हणाल्या आहेत.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी पोलीस महासंचालकांना पत्र लिहलं आहे. त्यात "मंत्री अब्दुल सत्तार यांनी खासदार सुप्रिया सुळे यांच्याबाबत अपमानास्पद उद्धार काढल्याची तक्रार राज्य महिला आयोगाकडे प्राप्त झाली आहे. महिलांना अपमानास्पद वागणूक देत, आक्षेपार्ह विधाने करत त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवणे, कमी लेखणे, कर्तुत्वहनन करणाऱ्या अशा वक्तव्याची आयोगाने दखल घेतली आहे. याप्रकरणी राज्याचे पोलीस महासंचालकांनी कायदेशीर कारवाई करावी आणि त्याचा अहवाल तात्काळ सादर करावा, अशी सूचना आयोगाकडून देण्यात आली आहे, असे रुपाली चाकणकर यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले.



## जावई शोध



आधुनिक केसरी

महिलांविषयी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यामुळे पोलंडचे सत्ताधारी पक्षाचे नेते जारास्लहव काझीन्स्की यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. महिला जास्त प्रमाणात दारू पित असल्यानं देशात जन्मदर घसरला आहे, असे वादग्रस्त विधान काझीन्स्की यांनी केले आहे. त्यांच्या या विधानावर पोलंडमधील जनतेकडून रोष व्यक्त करण्यात येत आहे. महिलांविषयी त्यांची ही टीपण्णी निर्थरक आणि पितृसत्ताक असल्याचा हल्लाबोल पोलंडमधील राजकीय नेते, सेलिब्रेटींनी केला आहे. वयाच्या पंचविशीपर्यंत स्त्रिया त्यांच्या वयाच्या पुरुषांपेक्षा जास्त दारू पितात, अशी परिस्थिती आहे. यामुळे मुले होत नाही, असे अजब वक्तव्य काझीन्स्की यांनी केल्याचे वृत्त 'गार्डीयन'ने दिले आहे. काझीन्स्की यांनी हा विचित्र दावा करताना, महिलांनी केवळ दोन वर्ष, तर पुरुषांनी सरासरी २० वर्ष जास्त प्रमाणात मद्यपान केले पाहिजे, असे म्हटले आहे. डॉक्टरांच्या अनुभवानुसार आपण हा दावा करत असल्याचे काझीन्स्की यांनी सांगितले आहे. डॉक्टरांनी आपल्या दारुड्या मित्राला बरे केले, पण त्याचवेळी त्यांना एका महिलेचं व्यसन सोडवता आले नाही, असा दाखला देत काझीन्स्की यांनी जन्मदराविषयीचा अजब दावा केला आहे. पोलंडमध्ये सध्या प्रत्येक महिलेच्या तुलनेत १.३ असा मुलांचा जन्मदर आहे. हा जन्मदर सरासरीपेक्षा कमी असल्याचे वृत्त 'गार्डीयन'ने दिले आहे. आर्थिक स्थैर्य आणि गर्भपाताच्या निर्बंधांमुळे पोलंडमधील महिलांमध्ये मुल होऊ देण्यास आत्मविश्वास नाही, हे संभाव्य कारण असल्याचे तज्ज्ञांनी म्हटले आहे.

# EWS आरक्षण : श्रेयासाठी कुरघोडी

आधुनिक केसरी

**उच्चवर्णीयांमधील आर्थिक दुर्बलांना दहा टक्के आरक्षणाचा लाभ देणाऱ्या १०३ वी घटनादुरुस्तीच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले. या निकालाचे भाजप आणि काँग्रेस यांनी स्वागत केले असले तरी, या आरक्षणाच्या धोरणाचे श्रेय घेण्यावरून दोन्ही राष्ट्रीय पक्ष एकमेकांवर कुरघोडी करत आहेत.**

## दिल्ली डायरी



अजय शर्मा, नवी दिल्ली

काँग्रेसचे माध्यम विभागाचे प्रमुख जयराम रमेश यांनी पक्षाच्या वतीने अधिकृत प्रतिक्रिया दिली. अनुसूचित जाती-जमाती व ओबीसींव्यतिरिक्त अन्य समाजातील आर्थिक दुर्बल घटकांना आरक्षणाची तरतूद करणारी १०३वी घटनादुरुस्ती योग्य असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला असून या निर्णयाचे काँग्रेस पक्ष स्वागत करतो, असे ट्वीट रमेश यांनी केले. मात्र, ही घटनादुरुस्ती केंद्रातील मनमोहन सिंग सरकारच्या प्रयत्नांमुळे झाली असल्याचा दावा रमेश यांनी केला आहे. २००५-०६ मध्ये केंद्रातील मनमोहन सिंग सरकारने आर्थिक दुर्बलांना आरक्षण देण्यासंदर्भात सिन्हो समिती स्थापन केली होती. या समितीने जुलै २०१० मध्ये अहवाल केंद्र सरकारला सादर केला होता. त्यानंतर सखोल सल्ला-मसलती झाल्यानंतर २०१४ मध्ये विधेयक तयार करण्यात आले होते. पण, त्यानंतर मोदी सरकारला हे विधेयक मंजूर करण्यास पाच वर्षे लागली, असे रमेश यांनी स्पष्ट करत अप्रत्यक्षपणे या आरक्षणाचे श्रेय काँग्रेसकडे जात असल्याचे सूचित केले. देशातील गरीब घटकांचा विकास झाला पाहिजे, त्यांना सामाजिक समान दर्जा मिळाला पाहिजे, ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भूमिका असून सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने मोदींच्या दूरदृष्टीवर शिक्कामोर्तब केले आहे.

ही घटनादुरुस्ती ऐतिहासिक असून अन्य समाजघटकांच्या आरक्षणाला धक्का लागलेला नाही, असे मत भाजपचे प्रवक्ता गौरव भाटिया यांनी व्यक्त केले.

काँग्रेसने अधिकृतपणे न्यायालयाच्या निकालाचे स्वागत केले असले तरी, पक्षाचे दलित नेते उदित राज यांनी नाराजी व्यक्त करून सर्वोच्च न्यायालयाचा निकाल जातीवादी असल्याची टीका केली आहे. 'सर्वोच्च न्यायालय जातीवादी आहे, याबद्दल अजूनही कोणाला शंका आहेत का? उच्चवर्णीयांमधील आर्थिक दुर्बलांना आरक्षण देण्याची वेळ आली, तेव्हा न्यायालयाने कशी भूमिका बदलली बघा. ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण संविधानाचे उल्लंघन होत नाही असे न्यायालय म्हणते. पण, अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसींना आरक्षण देण्याची वेळ येते तेव्हा मात्र न्यायालयाला इंदिरा सहानी निकालाच्या ५० टक्के आरक्षण मर्यादेची आठवण होते, अशी तीव्र प्रतिक्रिया उदित राज यांनी व्यक्त केली आहे.

काँग्रेसचे रमेश यांच्या व उदित राज यांच्या प्रतिक्रिया परस्परविरोधी असल्याने पक्षाची नेमकी भूमिका काय याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. मात्र, उदित राज यांच्या नाराजीवर भाजपचे प्रवक्ते गौरव भाटिया यांनी टीका केली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याबद्दल अभद्र टिप्पणी उदित राज यांनीच केली होती. काँग्रेसची भूमिका नेहमीच दलित, आदिवासी, सेनाविरोधी होती, आज ती गरीबविरोधीही असल्याचे स्पष्ट झाले आहे, अशी टीका भाटिया यांनी केली.

आर्थिक दुर्बल घटकांच्या आरक्षणाच्या निमित्ताने काँग्रेसने पुन्हा ओबीसी जनगणनेची मागणी केली आहे. २०१२ मध्ये सामाजिक आर्थिक व जातनिहाय जनगणना पूर्ण झाली असून मोदी सरकारने यासंदर्भात अजूनही स्पष्ट भूमिका घेतलेली नाही. ओबीसींची जनगणना नव्याने करणे गरजेचे असून काँग्रेसचा या मागणीला पाठिंबा आहे, असे जयराम रमेश यांनी म्हटले आहे. मनमोहन सिंग सरकारच्या काळात रमेश यांच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने सामाजिक-आर्थिक पाहणी केली होती.

संविधानाच्या चौकटीत १०३ वी घटनादुरुस्ती झाल्याचे सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले आहे. काळानुसार कायदे आणि नियमांमध्ये बदल करावे लागतात, अशी प्रतिक्रिया केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय महत्त्वपूर्ण आणि दिशादर्शक आहे. त्यामुळे राज्यात मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत या समाजातील आणि अल्पसंख्याक समाजातील गरिबांना आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असे मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. आरक्षण दिल्याबद्दल फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन केले. ईडब्ल्यूएस आरक्षणाने आरक्षणाची कमाल ५० टक्के मर्यादा ओलांडली आहे. न्यायालयाचा निर्णय ऐतिहासिक आहे, असे फडणवीस म्हणाले.

आर्थिक दुर्बल घटकांना नोकरी आणि शिक्षणात आरक्षण देण्याबाबतच्या सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निकालाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वागत केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे सर्व जाती-धर्मातील गरीब घटकांना मोठा दिलासा मिळणार आहे. गोरगरिबांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हे आरक्षण नक्कीच उपयोगी ठरणार आहे.

आर्थिक दुर्बल घटकांच्या आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल हा वैचारिक तसेच बौद्धिक भ्रष्टाचार आहे. या निकालामुळे मनुस्मृतीचा मागील दाराने पुन्हा प्रवेश होईल, अशी प्रतिक्रिया वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केली. आर्थिक आणि सामाजिक आरक्षण वेगळे आहे, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. परंतु घटनेत आर्थिक आरक्षणाची तरतूदच नाही. आर्थिक आरक्षण लागू करण्याचा अधिकार संसदेला आहे का, या मुद्द्याला सर्वोच्च न्यायालयाने स्पर्शच केलेला नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे देशात गोंधळाचे वातावरण निर्माण होईल. या निर्णयामुळे देशात शांतता नव्हे, तर अशांतता निर्माण होईल, असे आंबेडकर म्हणाले.

तत्कालीन महान्यायवादी के. के. वेणुगोपाल आणि महाधिवक्ता तुषार मेहता यांच्यासह वरिष्ठ कायदेतज्ज्ञांचे युक्तिवाद ऐकल्यानंतर 'आर्थिक दुर्बल आरक्षणाने संविधानाच्या मूलभूत संरचनेचे उल्लंघन केले आहे का' या कायद्याशी संबंधित कळीच्या प्रश्नावरील निकाल सर्वोच्च न्यायालयाने २७ सप्टेंबर रोजी राखून ठेवला होता. घटनापीठाने या प्रकरणाची सुनावणी सलग साडेसहा दिवस घेतली होती.

शिक्षणतज्ज्ञ मोहन गोपाल यांनी १३ सप्टेंबरला खंडपीठासमोर याबाबत युक्तिवाद सुरू केला. आर्थिक दुर्बल घटकांना आरक्षण देणाऱ्या घटनादुरुस्तीला विरोध करीत त्यांनी, 'मागील दाराने मूळ आरक्षणाची संकल्पना नष्ट करण्याचा हा प्रयत्न आहे,' असे म्हटले होते.

तमिळनाडू सरकारनेही आर्थिक दुर्बलांच्या आरक्षणाला विरोध केला होता. वरिष्ठ विधितज्ज्ञ शेखर नाफडे यांनी तमिळनाडू सरकारची बाजू मांडताना, आर्थिक निकष हा आरक्षणाच्या वर्गीकरणाचा आधार होऊ शकत नाही. त्यामुळे न्यायालयाने हे आरक्षण कायम ठेवण्याचा निकाल दिल्यास इंदिरा साहनी (मंडल) खटल्याच्या निकालाची पुनरावृत्ती होईल, असे मत तमिळनाडू सरकारने मांडले होते.

# व्यवहारातील रोख रकमेचे प्रमाण कमी करण्याचे आव्हान



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**नोटबंदीमुळे पैशांच्या देवघेवीसाठी डिजिटल मार्ग वापरण्याचा प्रघात पडू लागला, ही एक चांगली गोष्ट घडली. क्रेडिट कार्ड, ऑनलाइन पेमेंट, युनिफाइड पेमेंट इंटरफेस (यूपीआय)चे गूगल पे, पेटीएम, फोनपे आदी मार्ग असे बरेच काही या काळात विकसित झाले. अर्थात नोटबंदीच्या निर्णयाची कटू वृक्षाची गोड फळे कोणास मिळाली हेही समोर आले. डिझिटल कंपन्या फायद्यात आल्या. स्मार्टफोनचा वापर वाढला. भारतात आज घडीला 145 कोटी लोकसंख्येपैकी 93 कोटी लोकांकडे स्मार्टफोन आहेत. पुढील वर्षी हा आकडा 100 कोटी होण्याची शक्यता आहे. पण या पाच वर्षात पुन्हा रोख रक्कम चलनात वाढली त्याचे काय?**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 8 नोव्हेंबर 2016 रोजी संपूर्ण देशात नोटबंदी जाहीर केली. देशातला काळा पैसा नष्ट करणे, दहशतवाद्यांस होणारा निधीपुरवठा उद्ध्वस्त करणे आणि बनावट नोटा नेस्तनाबूत करणे आदी अनेक उद्दिष्टे सरकारने हा निर्णय घेताना दिला होता. आज या निर्णयाला पाच वर्षे उलटली आहेत. त्यावेळी नोटबंदीमुळे लोकांना अतोनात त्रास झाला. पैसे काढण्यासाठी बँकेसमोर गर्दीच्या रांगेत उभारलेल्या अनेकांना जीव गमवावा लागला. अनेकांना गरजेला पैसा मिळाला नसल्याने दिवस तापदायक गेले.

जनतेस त्या वेळेस होत असलेल्या प्रचंड हालअपेष्टांवर सरकारने 'दीर्घकालीन भल्या'ची फुंकर मारली होती. म्हणजे या निर्णयाने त्या वेळी तूर्त त्रास होत असला तरी अंतिमतः दीर्घकालात त्याचा फायदाच होईल, असे सरकारने म्हटले होते. आज या निर्णयाला जवळपास पाच वर्षे होऊन गेली आहेत. त्यामुळे आज याचा काय फायदा झाला कळायला मार्ग नाही. आपला नोटबंदीचा निर्णय पूर्णपणे फसला आहे, हे सांगायला सरकारकडे उदार मनही नाही. चांगल्या गुंतवणूक योजना पाच-सहा वर्षांच्या असतात आणि त्यातील गुंतवणूक दीर्घकालीन मानली जाते. त्यामुळे पाच वर्षांचा कालावधी उलटल्यानंतर या नोटबंदी निर्णयाचा जमाखर्च मांडणे आवश्यक ठरते.अर्थव्यवस्था अधिकाधिक औपचारिक करून रोख रकमेचा विनियोग कमी करणे हेही नोटबंदी निर्णयामागील महत्त्वाचे उद्दिष्ट होते,मात्र आज काय परिस्थिती आहे? उलट आज सर्वाधिक व्यवहार रोख रकमेने होत आहे. सहा वर्षात रोकड रक्कम दुप्पट झाली आहे.

आर्थिक व्यवहारातील चलनी नोटांचे प्रमाण कमी होण्यासाठी 500 आणि 1000 रुपयांच्या नोटा रद्द करत व्यवस्थेतील जवळपास 84 टक्के रक्कम सरकारने या निर्णयाद्वारे एका झटक्यात काढून घेतली. त्यामुळे 15.41 लाख कोटी रु. तरी रक्कम निकालात निघाली. पण त्यातील 99.99 टक्के इतकी रक्कम बँक आणि इतर मार्गाने अर्थव्यवस्थेत परतली. म्हणजे काळा पैसा दूर करण्याचा दावा तेथल्या तेथेच निकालात निघाला. आता रोख रकमेचा वापर कमी होण्याच्या उद्दिष्टाचे काय झाले हेही दिसून आले.पाच वर्षांपूर्वी नोटबंदी धाडसी, धडाडीपूर्ण इत्यादी निर्णय घेतला जाण्याआधी आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेत सुमारे 16 लाख कोटी रुपयांची रोख रक्कम होती. आज नोटबंदीला सहा वर्षे पूर्ण झाले असताना व्यवस्थेत असलेली रोख रक्कम 31 लाख कोटी रुपयांहून अधिक आहे. म्हणजेच या सहा वर्षांत 15 लाख कोटी रुपयांची अतिरिक्त रोकड चलनात आली. याचाच अर्थ असा की नोटबंदी निर्णयानंतर दरवर्षी दोन लाख कोटी रु. इतक्या मोठ्या वेगाने उलट हे रोख रकमेचे प्रमाण वाढत गेले. म्हणजे नोटबंदीने साधले काय हा प्रश्नच विचारण्याची आता गरज नाही; कारण पाच वर्षांत रोकड वापर वाढला, सकल राष्ट्रीय उत्पन्नही घसरले अशी कटू उत्तरे समोर आहेत.

इतकेच नव्हे तर या काळात एकूण रोख रकमेतील वजनदार चलनी नोटांचा वाटा तसूभरही कमी झालेला नाही. नोटबंदीचा निर्णय घेतला गेला तो पाचशे आणि हजार रुपयांच्या नोटा रद्द करण्यासाठी. सरकारने एक हजार रुपयांच्या नोटा रद्द केल्या



खऱ्या. पण त्या बदल्यात दुप्पट म्हणजे दोन हजार रुपयांच्या नोटा आणल्या. त्या वेळी चलनात पाचशे रुपयांच्या नोटांचा वाटा होता 44.4 टक्के इतका. त्यापाठोपाठ 39.6 टक्के इतका वाटा होता एक हजार रुपयांच्या नोटांचा. दोन्ही मिळून हे प्रमाण 84 टक्के होते. त्यात पाचशे रुपयांच्या नोटा रद्द करून पुन्हा पाचशे रुपयांच्याच नोटा आणण्यामागील अथवा हजार रुपयांच्या नोटा रद्द करून दोन हजार रुपयांच्या नोटा आणण्यामागील कार्यकारणभाव सरकारने कधीही जनतेसमोर मांडला नाही. पण आजची परिस्थिती अशी की आज चलनात पाचशे रुपयांच्या नोटांचे प्रमाण आहे 68.4 टक्के आणि दोन हजार रुपयांच्या नोटा आहेत 17.3 टक्के. म्हणजे हे दोन्ही मिळून होतात 85.7 टक्के. या आकडेवारीस अधिक भाष्याची वा स्पष्टीकरणाची गरज नाही. तेव्हा या निर्णयाने साधले काय या प्रश्नाचे उत्तर शोधण्याची गरज नाही, इतके वास्तव स्पष्ट आहे. शिवाय सुमारे नऊ टक्क्यांनी वाढणारी आपली अर्थव्यवस्था नोटबंदीनंतर तीन टक्क्यांपर्यंत घसरली. पाठोपाठ जीएसटी कर आला आणि तो स्थिरावयाच्या आत सुरू झाला करोनाकाळ. आगीतून उठून फुफाटयात पडल्यासारखे झाले. नोटबंदीमुळे पैशांच्या देवघेवीसाठी डिजिटल मार्ग वापरण्याचा प्रघात पडू लागला, ही एक चांगली गोष्ट घडली. क्रेडिट कार्ड, ऑनलाइन पेमेंट, युनिफाइड पेमेंट इंटरफेस (यूपीआय)चे गूगल पे, पेटीएम, फोनपे आदी मार्ग असे बरेच काही या काळात विकसित झाले. अर्थात नोटबंदीच्या निर्णयाची कटू वृक्षाची गोड फळे कोणास मिळाली हेही समोर आले. डिझिटल कंपन्या फायद्यात आल्या. स्मार्टफोनचा वापर वाढला. भारतात आज घडीला 145 कोटी लोकसंख्येपैकी 93 कोटी लोकांकडे स्मार्टफोन आहेत. पुढील वर्षी हा आकडा 100 कोटी होण्याची शक्यता आहे. पण या पाच वर्षात पुन्हा रोख रक्कम चलनात वाढली त्याचे काय? अर्थव्यवस्थेच्या डिजिटायझेशनची गती वाढू शकली असती. पण सरकारी धोरणशून्यतेमुळे जे काही घडले त्याचे भयकारी चित्र समोर आल्याने घराघरांत रोख रक्कम बाळगण्याचे प्रमाण वाढले. न जाणो आपल्यावर कोणता प्रसंग कधी येईल हे सांगता येत नाही, या अनिश्चिततेतून पुन्हा एकदा रोखीचे महत्त्व वधारले. त्यामुळे डिजिटल पेमेंट मार्गाचा किती उदोउदो करायचा हा प्रश्नच आहे. पण तरीही केंद्र सरकार नोटबंदीचा निर्णय पूर्णपणे फसला आहे,हे का मान्य करत नाही? आता ऑनलाईन व्यवहार वाढत असतानाच नागरिकांकडे असलेल्या रोख रकमेचे प्रमाण कमी करणे हे केंद्र सरकारपुढील आव्हान आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : MAH/2021/82566, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAH/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# काँग्रेसची पदयात्रा इकडे शेतकऱ्यांची अंत्ययात्रा ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**भारतात काँग्रेसचे नेते व खा. राहूल गांधी भारत जोडो यात्रा, तर पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रानखान हे पाकमधील लोकतंत्र वाचविण्यासाठी आझादी मार्च काढत आहेत. हा योगायोग म्हणायचा का? गांधी यांची ही यात्रा महाराष्ट्राच्या सीमेवर नांदेड येथे पोहोचाच तिचे काँग्रेसने जोरदार स्वागत केले आहे. तर इकडे हदगाव तालुक्यातील बनचिंचोली येथील गजानन ढवळे या शेतकऱ्याने खासगी सावकाराच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली. इकडे शेतकऱ्याची अंत्ययात्रा निघाली, हे देशाचे दुर्देव की शेतकरी रोज आत्महत्या करतो आहे. राजकारणी नेत्यांना याचे सुतक नाही. सर्वच नेते राजकारणात मश्गुल आहेत. गांधीची यात्रा जवळून जाणार आहे. ते या शेतकरी कुटुंबाची भेट घेणार आहेत काय? हे पहावे लागेल.**


राज्यात अवैध सावकारी व्यवसायाने थैमान घातले आहे, अनेकांचा बळी घेत आहे. यावर कोणी बोलत नाही. उलट हदगाव घटनेत सावकारी कृत्यावर पांघरण घालण्याचे काम चालू आहे. केंद्र व राज्यात कोणत्याही पक्षाची सत्ता असो, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थाबंवू शकलेल्या नाहीत. कारण याचे मूळ कारणांचा शोधच घेतला जात नाही. म्हणता ना 'रोग म्हशीला अन् इंजेक्शन पखालीला' असे चाललेय! शेतकऱ्यांच्या नावावर राजकारण केलं जातंय! आम्ही सत्तेत होतो, तेंव्हा शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होत्या? तुम्ही सत्तेत आल्यानंतर शेतकरी आत्महत्या वाढल्या, असे गलिच्छ मोजमाप केले जाते. केंद्रात काँग्रेस दीर्घकाल सत्ता होती. तेंव्हा काँग्रेसला शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवता का आलेला नाही. १९६५ मध्ये कृषी मुल्य आयोग स्थापना झाली. १९५५ मध्ये देशात बाजार समित्या अस्तित्वात आल्या. पण शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव देता आलेला नाही. १९७९ मध्ये शरद जोशी यांनी शेतकरी संघटीत केले व शेतकरी स्थापन केली. तेंव्हा ' भीक नको हवेत घामाचे दाम' असा नारा देत त्यांनी शेतकऱ्यांना जागृत केले व आंदोलन केले. तेंव्हा काँग्रेसने जोशींचा जात पाहिली, त्यांना शेतीतले काय कळतय? असा प्रश्न केला होता. त्याच जोर्शींनी शेतीचे अर्थशास्त्र देशासमोर ठेवल. काँग्रेस सरकारने शेतकरी आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला.त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. यात अनेक शेतकरी हुतात्मा झाले आहेत. तेंव्हापासूनच काँग्रेसचा चेहरा शेतकरी विरोधी होता, तो आताही आहे. आता काँग्रेस पक्षाला महागाई, बेकारी वाढलेली दिसतेय! काँग्रेस सत्तेत असताना हे प्रश्न नव्हते काय? काँग्रेस सत्तेत आली की, चुटकशी हे प्रश्न सुटणार आहेत काय? मोदी सरकारने शेतकऱ्यांना मोफत धान्य, आरोग्य विमा, पीक विम्याची अमंलबाजावणी तसेच केंद्राकडून थेट आर्थिक मदत दिली जात आहे, हेसुध्दा पुरेसे नाही. देशातील शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य हमी भाव मिळावी, ही प्रमुख मागणी आहे. मोदी सरकारने २०२० मध्ये तीन कृषी संशोधन कायदे आणले. संसदेने बहूमताने संमत केला. या कायद्याची अमंलबजावणी सुरु झाली नसताही काँग्रेसने या कृषी कायद्याला 'काळा कायदा' म्हणून विरोध केला.यातून दिल्लीत आंदोलन झाले, त्याला हिंसक वळण लागले होते. यात देशविरोधी शक्ती यात सहभागी झाल्या. तेंव्हा मोदी सरकारने सर्वोच्च न्यायालयाची निर्णयाची वाट न पहाता हा कायदा मागे घेतला.हे मोदी सरकारची मोठी नामुश्की ठरणारी घटना आहे. देशाच्या सर्वोच्च न्यायालयात काही प्रकरणात न्यायाधीशांचे एकमत नसले तरी तेथे बहुमताचा निर्णय मान्य केला जातो. हाच नियम संसदीय प्रणालित लागू आहे. काँग्रेस सरकारने सत्तेत असताना संसदेतील पाशवी बहुमताचा फायदा घेतलेला आहे. काँग्रेसला जर नवीन कृषी नको होता तर मग सकात्मक पर्याय का सुचविला नाही? या विषयावर काँग्रेसची दुटप्पी भूमिका पहावयाला मिळेल. केंद्रातील सत्ता गेल्यानंतर शेतकऱ्यांबद्दल कळवळा दाखवत आहेत.

देशात २००४ मध्ये सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. यात सर्वात आत्महत्या महाराष्ट्रात झाल्या होत्या. त्यात विदर्भात आणि मराठवाड्यात शेतकरी आत्महत्याचे प्रमाण अधिक आहे. त्यानंतरच जाग आली. तेंव्हा काँग्रेस सरकारने हरितक्रांतीचे जनककृषी तज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांची २००४ मध्ये अभ्यास समिती नेमली होती. या समितीचा अहवाल २००६ मध्ये आला. तेंव्हा जाणता राजा व दूरदृष्टी नेते, शरद पवार यांच्याकडे केंद्रातील कृषी खाते होते. त्यांनी स्वामीनाथन आयोगाचा अहवाल स्वीकारला नाही, तो गुंडाळून ठेवला होता. त्यावेळी शासकीय कर्मचाऱ्यांच्या पाचव्या वेतनाला पैसा देण्यास प्राधान्य दिले. सत्तेतून गेल्यानंतर अहवाल विसरुन राहिला, अशी कबुली पवारांनी दिली होती. त्यानंतर काँग्रेसने २००८ निवडणुक डोळ्यासमोर ठेऊन ५२ हजार कोटीची कर्जमाफीचा निर्णय घेतला. पण याचा अधिक लाभ मात्र पश्चिम महाराष्ट्रातील बड्या शेतकऱ्यांची लाखोची कर्ज माफ झाली आहे. दुसरीकडे कोरडवाडवाहू शेतकऱ्यांच्या हातात काही पडलेले नाही. यातून तोट्यात आलेल्या बँकेच्या तिजोऱ्या भरल्या गेल्या. या कर्जमाफीतही घोटोळा झाल्याचे 'कॅग'च्या अहवाल म्हंटले गेले. त्याची चौकशी झाली नाही अथवा कारवाई गेली नाही. महाराष्ट्रात सहकार क्षेत्राचे वाटोळे कोणी केले. सहकारी संस्था तोट्यात दाखवून त्या अवसायानात काढल्या गेल्या. या सहकारी संस्थाची तोट्याची माहिती राज्य शासनाच्या मागील आर्थिक अहवाल पहावयाला मिळेल. त्यात साखर कारखाने तोट्यात गेले, ते राजकीय पुढाऱ्यांनी विकत घेतले आहेत. जिल्हा बँका बुडाल्या, त्यात नांदेडची जिल्हा सहकारी बँक होती. यातील घोटोळेबाजांवर कारवाई झालेली नाही. राज्य सहकारी बँकेतील आता बड्या राष्ट्रवादी नेत्यावर गुन्हा दाखल झालेला आहे. पुढे यात काय होणार! यात नेत्यांना क्लिनचीट मिळालेली दिसेल? राज्यातील सिंचनात ७० हजार कोटीचा घोटाळा झाला व आमच्याकडे गाडीवर पुरावे आहेत, असे भाजपा नेत्याचे म्हणणे होते. या भाजपाने निर्लज्जपणे सत्तेसाठी मधूचंद्र केला. पण लगेचच यांच्यात काडीमोड झाला म्हणून वाचले.



काँग्रेस व राष्ट्रावादी काँग्रेस पक्षाला भ्रष्टाचाराविषयी चीड नाही. काँग्रेस नेते राहूल गांधी यांच्या विरोधात नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी चौकशी चालू आहे, ते स्वतः जामीनावर आहेत. तेंव्हा बाबा जनतेला 'देश जोडो'चा संदेश देण्यासाठी निघाले आहेत. काँग्रेसमधील व विशेष म्हणजे गांधी घराण्यातील राजपूत्र म्हणून राहूल गांधींच्या स्वागतासाठी राज्यातील ज्येष्ठ नेते, काँग्रेस नेते व अंधभक्त पायघड्या घालत आहेत. दुर्देव हे की, या गांधींची महात्मा गांधीजींची दांडी यात्रेशी तुलना केली जात जात आहे. भारत जोडलेला आहेच तो तुटलेला नाही, तो एकसंघ आहे. स्वातंत्र्यानंतर काँग्रेस सरकारने तुष्टीकरणातून देश तोडण्याचे अनेक निर्णय घेतले आहे. यातून जम्मू-काश्मीरसाठी स्वतंत्र घटना तयार केली. हिंदुंना 'अतिरेकी हिंदू' काँग्रेसच्या नेत्याने हिंदु शब्दच 'घाण" असे म्हंटले आहे. 'काँग्रसेचा धंदा हिंदु शब्द गंदा'यातूनअसे म्हणावे लागेल. यातून देश जोडला जाणार आहे काय? देशाचे तुकडे करण्याची भाषा करणाऱ्याचे गांधी समर्थक होते. आता ते देश जोड्याचे यात्रेचे नाटक करत आहेत. काँग्रेसचे धर्मातील कट्टरतेच्या विरोधात असेल तर मग भारतीय घटनेच्या चौकटीत देशात कायदे होत असताना जो कोणी धर्माचा आधार घेत असेल तर त्याला विरोध केला पाहिजे, मग तो कोणताही धर्म नेता असो. पण काँग्रेस इतर धर्मातील कट्टरतेवर सवाल करत नाहीत. देशात सर्वच धर्मियांना समान न्याय मिळावा, असे काँग्रेस पक्षाचे आजपर्यंत धोरण राहिलेले नाही व भविष्यात असणार नाही, काँग्रेसच्या या भूमिकेमुळे 'भारत जोडला' जाणार आहे का? देशात दोन स्वतंत्र घटना करण्याच्या विरोधात घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका होती. आता 'भारत जोडो'हे गोडस नाव दिले जात आहे. या काही नामवंत विचारवंत, समाज सुधारक बुरखा पांघरलेले पण गांधी व काँग्रेस समर्थक आणि मोदी विरोधक यात सहभागी होत आहेत. या पदयात्रेला सुरक्षा व्यवस्थेचेकडे घातलेले आहे, ते मोदी विरोधी लोकांच्याच हात हातात देत आहेत. त्यात केवळ 'छबी' घेण्यासाठी काही सामान्यांचा वापर केला जात आहे. या यात्रेला काँग्रेसलाही फायदा होत नाही, असेच दिसतेय. कारण तेलंगणा राज्यातून यात्रा आली. तेथील पोटनिवडणुकीत जनतेने काँग्रेसला स्वीकारलेले नाही. एकूण सात पैकी तीन जागेवर काँग्रेस निवडणूक लढविली होती. त्यात पराभव झाला. यात काँग्रेस मतांचे प्रमाण घटले आहे. यावरून काँग्रेस कमजोर होत चालले आहे, पक्षाला बाळसे गांधी घराण्याच्या विचाराच्या हिंदू विरोधी 'सायरप'ने येणारे नाही. देशात हिमाचल प्रदेश व गुजरात राज्यात विधानसभा निवडणुका होत आहेत. तेथे काँग्रेस पक्षाचे अस्तित्व दिसत नाही.दोन्ही राज्यात काँग्रेसला यश मिळण्याचा शक्यता दिसत नाही. पण गांधी देशभर पंतप्रधान मोदींना आव्हान देण्याचे भाषा करत आहेत. राहुल गांधी यांनी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवडणूक लढविली नाही, कारण ते पंतप्रधान होण्याचे स्वप्न पहात आहेत. २०२४ मध्ये तरी पूर्ण होईल काय? नुकतेच देशातील खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्यांना वर्गाला मोदी सरकारने दहा टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला, त्यावर सर्वोच्च न्यायालयाने आता शिक्कामोर्तब केले आहे. पण काँग्रेस नेत्याने न्यायालयाच्या निर्णयालाही जातीयवादी मानसिकेतून दिला गेला, अशी प्रतिक्रिया दिलेली आहे. तेंव्हा काँग्रेस घटना, लोकशाही, संवैधानिक संस्थाचा सन्मान करत नाही, हे दिसतेय! काँग्रेस पक्षाला सामान्य माणसाच्या प्रश्नाचे काही देणे- घेणे नाही. तसेच राज्यातील भाजपा नेत्याला दिसत नाही, परवा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन आले होते. पालमंत्र्याचा दौरा शासकीय का राजकीय? या दौऱ्यात सामान्य माणसांना भेटले का! त्यांनी योजनेचा आढावा घेतलेला नाही. गरिबांना धान्य वेळेवर मिळते काय? नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळते काय? पंतप्रधान आवास योजनेत किती कुटुंबाना लाभ मिळाला? पंतप्रधान विमा योजनेत किती जणांना मदत मिळाली? या योजनांचा त्यांनी कानोसा सुध्दा घेतलेला दिसत नाही, पण ते भाजपाच्या नेत्यांच्या निवासस्थानी भेट, दुर्मिळ छायाचित्रे मात्र पहाता आली. नांदेड जिल्हा पातळीवर भ्रष्टाचाराच्या असंख्य तक्रारी आहेत. असंख्य गरीब, सामान्य कुटुंबाला केंद्र व राज्य शासनाच्या योजनेचा अजूनही लाभ मिळत नाही. भाजपा नेते आणि पालकमंत्री गिरीश महाजन यांनी दखल अथवा चौकशी केलेली नाही, दिसत नाही. देशात राजकीय यात्रा निघतात, यातून सामान्य माणसाचे प्रश्न सुटलेले नाहीत अथवा भलेही होत नाही! तो या यात्रेपासून अजून दूरच आहे.

# दिवाळी अंकांनी वाचकप्रियता वाढवली



उद्धव भयवाळ
संपर्क क्र. 8888925488

आधुनिक केसरी

**दिवाळी अंकांचे सुरुवातीचे स्वरूप आणि काळानुसार त्यात होत गेलेले बदल याबद्दल बरेच काही लिहिता येण्यासारखे आहे. मुख्य म्हणजे दिवाळी अंकाशिवाय मराठी माणसाची दिवाळी साजरीच होऊ शकत नाही, हे वास्तव आहे. आपल्या दिवाळी अंकांना शंभरपेक्षा जास्त वर्षांची परंपरा आहे.**

मनोरंजन हा १९०९ साली प्रकाशित झालेला पहिला दिवाळी अंक होय. काशिनाथ रघुनाथ आजगावकर या तेवीस वर्षांच्या तरुण पत्रकाराने १८९५च्या जानेवारीत ललित साहित्यावर भर देणारं नियतकालिक काढण्याचं धाडस केलं. नंतर त्यांनी १९०९ मध्ये 'मनोरंजन' नावाचा दिवाळी अंक प्रकाशित केला. म्हणूनच महाराष्ट्रातील दिवाळी अंकांची सुरुवात 'मनोरंजन' पासून झाली असे मानण्यात येते. आजगावकर यांचे बंगाली भाषेवर प्रेम होते म्हणून त्यांनी स्वतःचे आडनाव 'मित्र' केले. म्हणून 'मनोरंजन'च्या संपादकाचे नाव का. र. मित्र असे झाले. १९०९चा 'मनोरंजन'चा पहिला दिवाळी अंक मात्र अतिशय आकर्षक स्वरूपात छापण्यात आला होता. ललित वाङ्मयाच्या जोडीला शास्त्रीय, सामाजिक, राजकीय विषयांवरील लेखही प्रसिद्ध करण्यात आले होते.

स्वतंत्र दिवाळी अंकाचा मान 'मनोरंजन'कडे जात असला तरी त्या आधी १९०५ साली याच प्रकारचा एक प्रयत्न झाला होता. श्री. बाळकृष्ण विष्णू भागवत यांच्या 'मित्रोदय' या मासिकाने खास दिवाळी अंक काढला होता. 'नोव्हेंबर दिवाळीप्रीत्यर्थ' असा उल्लेख या मासिकावर होता. नियमितपणे दिवाळी अंक काढावे हा त्यांचा उद्देश होता की नव्हता, हे निश्चित नसलं तरी दिवाळीनिमित्त वाचकांना काहीतरी वेगळं आणि चांगलं वाचायला द्यावं, ही त्यांची भूमिका मात्र जरूर होती. पूर्णपणे वाङ्मयाला प्राधान्य देणारा हा अंक २४ पानांचा होता.दिवाळी अंकाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात म्हणजे १९५९ साली एकंदर दिवाळी अंकांची संख्या दीडशेच्या आसपास होती. ती वाढून आजच्या घडीला चारशेपेक्षा जास्त दिवाळी अंक प्रकाशित होत असतात. विशेष म्हणजे आपला दिवाळी अंक दर्जेदारच निघावा




असा प्रत्येक प्रकाशकाचा प्रयत्न असतो. त्यामुळे वाचकांनासुद्धा विविध दिवाळी अंकांमधून दर्जेदार साहित्य वाचायला मिळून त्यांची वाचनाची भूक भागवली जाते. दिवाळी अंकांमध्ये मजकुरापेक्षा जाहिरातींना अधिक महत्त्व दिल्याचे दिसते. जाहिरातींच्या संख्येवरच दिवाळी अंक निघणे अवलंबून असते असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

मात्र, २०२०च्या सुरुवातीला कोरोना नावाची महामारी आली आणि दिवाळी अंकांचे पूर्ण अर्थकारणच बदलून गेले. कोरोनाचा प्रभाव सर्वच क्षेत्रात पडल्यामुळे व्यापार थंड झाले आणि जाहिरातदारांनी दिवाळी अंकांसाठी जाहिराती देण्यास असमर्थता दर्शवली. त्यामुळे २०२० च्या दिवाळीमध्ये अनेक दिवाळी अंक प्रसिद्ध होऊ शकले नाहीत. तर काही प्रकाशकांनी नवीन मार्ग स्वीकारून डिजिटल स्वरुपात दिवाळी अंक काढायचे ठरवले. त्यामुळे वाचकांची वाचनाची भूक तरी भागली. पुढे हळू हळू स्थिती पूर्वपदावर येऊ लागली आणि २०२१ साली दिवाळी अंकांची संख्या बऱ्यापैकी वाढली. पुन्हा नव्या जोमाने दिवाळी अंक प्रसिद्ध होऊ लागले. या वर्षी तर सगळीकडे दिवाळी अंकांची रेलचेल पाहायला मिळत आहे.आता तर डिजिटल स्वरूपातील दिवाळी अंकसुद्धा वाचकप्रिय होऊ लागलेले आहेत. दिवाळी अंकाचे हे नवे रूपसुद्धा वाचकांनी आपलेसे केले.पूर्वी दिवाळी अंकांमध्ये कथा आणि कविता यांची रेलचेल असे. काही दिवाळी अंक केवळ विनोदी साहित्यास वाहिलेले असतात. अलीकडे मात्र एखादा सामाजिक किंवा आर्थिक विषय घेऊन त्यावर परिसंवाद घडवून आणण्याची प्रथा सुरु झाली. उदाहरणच द्यायचे झाले तर यंदाच्या 'हेमांगी' दिवाळी अंकाने "भारतीय इतिहासाच्या पुनर्लेखनाचा आग्रह कितपत योग्य?" या विषयावर परिसंवाद ठेवला आणि त्या परिसंवादात एकूण चौदा लेखकांनी सविस्तर लिखाण करून आपली मते नोंदवली. थोडक्यात, वरचेवर दिवाळी अंकांचे स्वरूप बदलत असले तरी त्यांची वाचकप्रियता जराही कमी झालेली नाही असेच म्हणवे लागेल.

# ताण तणावापासून दूर रहा!

आधुनिक केसरी

आज माणूस छोट्या-छोट्या अपेक्षांचे ओझे घेऊन जगत आहे. सातत्याने अतिविचार, इतरांशी आपली तुलना, अवास्तव स्वप्न पाहण्याची सवय, स्वतःपेक्षा इतरांचाच अधिक विचार अशा शुल्लक कारणावरून माणूस ताणतणावाच्या चक्रात गुतंत चालला आहे. माणूस जगण्यासाठी धावपळ करत आहे. परंतु व्यायामाच्या अभावामुळे अनेक ताणतणावाला त्याला सामोरे जावे लागत आहे. ज्यावेळेस कसली चिंता वाटायला लागते. अशावेळी ताणतणाव उत्पन्न होतो. कधी-कधी चिंताजनक परीस्थिती ओढवली की जीभ कोरडी पडते. छातीत धडधड वाढते, घाम फुटतो. अस्वस्थता वाढते. पाय जड होतात. पोटात गोळा उठतो. म्हणजेच माणसाच्या संपूर्ण शरीरावर परीणाम होत असतो. शारीरीक आजारांचे मूळ कारण देखिल ताणतणावच आहे. ताणतणावामुळे पेशींमधील टेलोमेरस या पेशींवरील रचनेवरतीच हल्ला करतो. यामुळे पेशींच्या पुनर्रनिर्माणाची प्रक्रिया मंदावते व पेशी वयस्क होतात. ताणतणावामुळे माणूस सतत चिडचिड करतो. निद्रानाश, उच्च, कमी रक्तदाबाला सामोरे जावे लागते.

जगभरात हार्टअॅटॅकचे मुख्य कारण मानसिक तणाव असल्याचं सिद्ध झाले आहे. आजच्या बदलत्या जीवनशैलीमुळे मानसिक आजारदेखिल वाढले आहेत. ह्रदयासंबधी समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्यासाठी तणाव निर्मित घटकांना आयुष्यातुन दुर सारले पाहीजे. आज लहान मुलांच्या जीवनावर देखील तणाव निर्माण होतो आहे. त्यासाठी तणाव टाळण्याचा मुलांनी प्रयत्न केला पाहिजे. दररोज व्यायाम तसेच शालेय विविध खेळात सहभागी झाले पाहिजे. नक्कीच मुलांचा ताणतणाव दुर होईल. आज माणसाला इच्छा नसतानाही त्याला दुःखाचा सामना करावा लागतो आहे. आपल्या आयुष्यात कितीही ताणतणाव येऊद्या ताणतणावाला दुर ठेवणे आपल्याच हातात आहे. आपल्याला ताणतणाव आल्यास आपण आत्मविश्वास ढळू देता कामा नये. मन सदा प्रफुल्लित ठेवले पाहिजे.

**–संतोष दत्तू शिंदे, संपर्क क्र. ७७२१०४५८४५**

# शेकडो वाक्सुमने आणि किस्से !



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**गुळाचा गणपती आणि सबकुछ पु.ल. म्हणून गाजलेल्या चित्रपटात पु. ल. देशपांडे यांच्या प्रतिभेच्या विविध पैलूंचे दर्शन घडते. ते शिक्षक, लेखक, नट, नकलाकार, गायक, नाटककार, विनोदकार, कवी, पेटीवादक, संगीत दिग्दर्शक, वक्ते आदी होते. त्यांनी एकपात्री-बहुपात्री नाटक, चित्रपट, नभोवाणी, दूरचित्रवाणी अशा सर्व क्षेत्रांत काम केले. अशा हरहुन्नरी व्यक्तिमत्वाची ओळख करून देण्याचा प्रयत्न.**

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे म्हणजेच पु.ल.देशपांडे ऊर्फ भाई ऊर्फ पुल हे लोकप्रिय मराठी लेखक, नाटककार, नट, कथाकार व पटकथाकार, दिग्दर्शक आणि संगीत दिग्दर्शक होते. त्यांना महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व असे म्हटले जाते. त्यांच्या आद्याक्षरांवरून महाराष्ट्रात ते पु.ल.म्हणून ओळखले जातात. त्यांचे मराठी भाषेवर विलक्षण प्रभुत्व होते. त्यांच्या भाषाप्रभुत्वाचे अनेक किस्से आहेत. त्यांच्यावर मराठीत भाई हा चित्रपट बनला आहे. या चित्रपटाचे दोन भाग आहेत.
ते हजरजबाबीही होते, त्यामुळे त्यांची शेकडो वाक्सुमने आणि विनोदी किस्से आहेत. मराठी साहित्य व संगीतातील योगदानाव्यतिरिक्त पुलंचे आकाशवाणी, दूरदर्शन, नाट्य व चित्रपट क्षेत्रातील कार्य लक्षणीय आहे. ते उत्तम संवादिनी वादक होते, तसेच त्यांनी काही चित्रपटांचे संगीत दिग्दर्शनही केले. पु.ल.देशपांडे यांचा जन्म दि.८ नोव्हेंबर १९१९ रोजी मुंबईतील गावदेवी या भागात चांद्रसेनीय कायस्थ प्रभू- सीकेपी कुटुंबामध्ये झाला. त्यांचे बालपण जोगेश्वरी येथील सारस्वत कॉलनीत गेले. त्यांनी पार्ले टिळक विद्यालयात शालेय शिक्षण घेतले आणि नंतर पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात आणि सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयात ते शिकले.
सन १९४०च्या दशकात साहित्यक्षेत्रात पदार्पण करण्यापूर्वी ते काही काळ शाळेमध्ये शिक्षक होते. सन १९४६ साली ते सुनीताबाईंशी विवाहबद्ध झाले. लेखक आणि कविवर्य वामन मंगेश दुभाषी ऊर्फ ऋग्वेदी हे त्यांचे आजोबा होते. ते साहित्याचे जाणकार होते. रवीन्द्रनाथ टागोर लिखित गीतांजली हा काव्यसंग्रह त्यांनी अभंग गीतांजली या नावाने मराठीत भाषांतरित केला होता.
देशपांडे यांचे वडील हे अडवाणी कागद कंपनीत दीडशे रुपये पगारावर फिरते विक्रेते होते. फिरतीवर असताना जेवणाखाण्याचा भत्ता मिळे. एकदा कोल्हापूरला असताना ते बहिणीकडे जेवले. त्यादिवशी त्यांनी भत्ता घेतला नाही, अशी आठवण पु.ल.देशपांडे यांनी सांगितली. ते लहानपणापासूनच धष्टपुष्ट होते. वयाच्या दुसऱ्या वर्षी ते पाच वर्षांच्या मुलाएवढे दिसत होते. ते हुशार होते आणि सतत काही ना काही करत असत. त्यांना स्वस्थ बसण्यासाठी घरचे लोक पैसा देऊ करायचे, पण हे त्यांना जमले नाही. आजोबांनी लिहून दिलेले आणि त्यांनी पाठ केलेले दहा-पंधरा ओळींचे पहिले भाषण वयाच्या पाचव्या वर्षी त्यांच्या शाळेत हावभावासहित खणखणीत आवाजात म्हणून दाखवले. सात वर्षे अशी भाषणे केल्यानंतर वयाच्या बाराव्या वर्षापासून ते स्वतःची भाषणे स्वतःच लिहू लागले. ते इतरांनाही भाषणे आणि संवाद लिहून देऊ लागले. त्यांना घरात खुप वाचन करायला व रेडिओवरील संगीत ऐकायला मिळाले. त्यांच्या घरी संगीताच्या बैठकाही होत असत. ते घरीच बाजाची पेटी शिकले. टिळक मंदिरात एकदा बालगंधर्व आले असता त्यांनी पेटी वाजवून दाखवली. बालगंधर्वांनी शाबासकी दिली व भावी कलाजीवनासाठी शुभेच्छा दिल्या. लोकांच्या वागण्यातील विसंगती व हास्यास्पद गोष्टी हेरून ते त्या लोकांच्या नकला करायचे. म्हणून घरी कुणी आले असता पुरुषोत्तम जवळ नसलेलाच बरा, असे आईला वाटत असे. त्यांची आई कारवारी, वडील कोल्हापूरचे आणि बहीण कोकणात दिलेली, त्यामुळे घरात भोजनात विविधता असे. यातूनच ते खाण्याचे शौकीन झाले. वडिलांच्या मृत्यूनंतर ते गाण्याच्या, पेटीच्या व अन्य शिकवण्या घेऊ लागले. ते शाळेत असल्यापासूनच भावगीते गायचे आणि गीतांना चाली लावायचे. कॉलेजात असताना त्यांनी राजा बढे यांच्या माझिया माहेरा जा या कवितेला चाल लावली. आज ते गाणे मराठी भावसंगीतातील अनमोल ठेवा समजला जातो. ग.दि. माडगूळकरांनी लिहिलेल्या व भीमसेन जोशींनी गायलेल्या इंद्रायणी काठी या गीताला त्यांनी चाल लावली

## पु. ल. देशपांडे जयंती विशेष



होती. तेही गाणे अजरामर झाले.
कॉलेजमध्ये असताना पु.ल. गायकांना साथ करीत. ते पेटी वाजवत, त्यांचा भाऊ रमाकांत तबला आणि मधुकर गोळवलकर सारंगी वाजवीत. मिळालेले १५ रुपये तिघेही वाटून घेत. पार्ले टिळक विद्यालयातून माध्यमिक शिक्षण पूर्ण करून ते मुंबईतील इस्माईल युसुफ कॉलेजातून इंटर व सरकारी लॉ कॉलेजमधून एलएलबी झाले. कलेक्टर कचेरी व प्राप्तीकर विभागात ते काही काळ नोकरी करून पुण्याला आले. त्यापूर्वी ते पेट्रोल रेशनिंग ऑफिसमध्ये कारकून आणि ओरिएंटल हायस्कूलमध्ये शिक्षक होते. पुण्याला आल्यावर त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमधून बीए आणि एमए केले. याच महाविद्यालयात असताना त्यांनी चिंतामण कोल्हटकरांच्या ललित कलाकुंज व नाट्यनिकेतन या नाट्यसंस्थांच्या नाटकांतून भूमिका करायला सुरुवात केली. सन १९३७पासून नभोवाणीवर पु.ल.देशपांडे छोट्या मोठ्या नाटिकांत भाग घेऊ लागले. त्या वर्षी त्यांनी अनंत काणेकरांच्या पैजार या श्रुतिकेत काम केले. सन १९४४ साली त्यांनी लिहिलेले पहिले व्यक्तिचित्र भट्या नागपूरकर हे अभिरुची या नियतकालिकातून प्रसिद्ध झाले. याच दरम्यान त्यांनी सत्यकथामध्ये जिन आणि गंगाकुमारी ही लघुकथा लिहिली. सन २०१४मध्ये प्रकाशित झालेले बटाट्याची चाळ हे त्यांचे विनोदी पुस्तक प्रसिद्ध आहे. सन १९४८ साली त्यांनी तुका म्हणे आता हे नाटक आणि बिचारे सौभद्र हे प्रहसन लिहिले. दूरदर्शनच्या पहिल्यावाहिल्या प्रसारणासाठी पंडित नेहरूंची दूरदर्शनसाठी मुलाखत घेणारे पुलं हे भारतीय दूरदर्शनचे पहिले मुलाखतकार होते. साहित्य अकादमी, संगीत नाटक अकादमी या दोहोंचे पुरस्कार मिळवणाऱ्या मोजक्या प्रतिभावंतात त्यांचा समावेश होतो. मुंबईच्या नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स- एनसीपीए या संस्थेत पुलंनी अनेक प्रयोग केले. संशोधकांना आधारभूत होतील असे असंख्य संदर्भ, कलांचा इतिहास, ध्वनिफिती, मुलाखती, लेख आदी बरेच साहित्य त्यांनी जमा करून ठेवले आहे. मराठी नाटकाचा आरंभापासूनचा इतिहास त्यांनी अशा जबरदस्त प्रयत्नान्ती जमा केला की त्यांच्यावरून स्फूर्ती घेऊन भारतातील अनेक जणांनी त्यांच्या त्यांच्या प्रांतांतील कलांचा इतिहास जमा करून नोंदवायची सुरुवात केली. एनसीपीएच्या रंगमंचावर त्यांनी देवगाणी, बैठकीची लावणी, दोन पिढ्यांची गायकी असे काही अनोखे कार्यक्रम सादर केले. ते भाषाप्रेमी होते. त्यांना बंगाली, कानडी येत असल्याने ते त्या त्या समाजातील लोकांत सहज मिसळत. दि.१२ जून २००० रोजी वयाच्या ८१व्या वर्षी पुण्यातील प्रयाग रुग्णालयात पुलंचे निधन झाले.
!! जयंती दिनी त्या हरहुन्नरी व्यक्तिमत्वाला साष्टांग दंडवत प्रणाम !!

# मेकिंग ऑफ अ न्युरोसर्जन : प्रसंग ६ सायलेंट हिरोज्!

आधुनिक केसरी

(मागील अंकावरून पुढे)


सर्व सिनिअर त्यांना सांगत होते की, "थांबा आता!संपलंय सगळं !" पण ती भाबडी मुलं थांबायला तयार नव्हती. कुणाचेच ऐकत नव्हती. त्यातला एकजण म्हणाला, "सर ,आज तक हमने CPR दे के कितने लोगोंको जिंदा किया है!तो हमारे दोस्त को हम कैसे जाने देंगे? " मुलं इरेला पेटली होती. एका पाठोपाठ एक बेडवर चढून त्याच्या छातीवर धपाधप CPR देत होती . त्यांचा मित्र त्यांना कधीच सोडून गेला होता. पण ही मुल हार मानतच नव्हती.
शेवटी १०-१५ मिनिटांनी सिनिअर म्याडम ओरडल्या "STOP IT, HE IS NO MORE! CONTROL YOURSELF !" ( थांबवा सर्व ! तो कधीच मरण पावलाय ) आणि मुलं भानावर आली.
आता अचानक कॅज्युअल्टीमध्ये भयाण शांतता निर्माण झाली. अमनदीप शांत झाला होता. बेडच्या आजूबाजूला रक्ताचा सडा पडला होता. सलाईनच्या बाटल्या, वापरलेली इंजेक्शनची आवरणं, हातमोजे,रक्ताच्या पिशव्या यांचा खच पडला होता.व्हेंटिलेटर अजूनही त्याच्या निर्जीव शरीरात श्वास फुंकत होता. आता आम्ही सर्व जण शांतपणे अमनदीपकडे बघत होतो. ती जीवघेणी शांतता असह्य होत होती.एका सिनिअर डॉक्टरनी सर्वांची परवानगी घेतली आणि व्हेंटिलेटर बंद केला.अमनदीप आम्हाला सोडून खूप लांब निघून गेला होता.
आता हळूहळू हुंदक्याचे आवाज येऊ लागले. सुरूवातीला दबक्या आवाजात येणारे हुंदके आता स्पष्ट ऐकू येत होते. ( लेडिज डॉक्टर्स ) मुली समोरच रडत होत्या. तर मुलांपैकी ( पुरुष डॉक्टर्स ) कुणी खांबां मागे लपून तर कुणी दारामागे तर कुणी बाथरूम मध्ये लपून रडत होते , तर सिनिअर डॉक्टर्स डोळ्यातले पाणी लपवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत होते.
एव्हाना १००-१५० डॉक्टर्स जमले होते. अनेक स्टाफ नर्सेस त्यांची ड्युटी संपलेली असताना देखील रात्रभर इथेच थांबून होत्या.कँपसमध्ये रहाणारे बरेचसे वॉर्डबॉइज् सुद्धा आपली काहीतरी मदत होईल या भावनेनं इथंच बसून होते.पण सत्य हेच होतं की आम्ही कुणीच अमनदीपची मदत करु शकलो नव्हतो!
कॅज्युअल्टीमध्ये आतापर्यंत २०-२५ इतर पेशंट व त्यांचे नातेवाईक जमा झाले होते. डॉक्टरांनी वेळेचं भान ठेऊन डोळे पुसत या बाकीच्या पेशंटना तपसायला चालू केलं. कारण या चार- पाच तासांमधे इतर पेशंटकडे फार ध्यान देणं शक्य झालं नव्हतं. त्यातल्या एका पेशंटला बघायला मी गेलो. तरुण मुलगा होता. तो पण गाडीवरून पडला होता. पण त्याला फार काही लागलं नव्हतं.मी त्याला म्हणालो. "डोक्याला थोडा मार लागलाय! टाके टाकावे लागतील!" तो मला म्हणाला, "सर मला काही नाही झालं .मी थांबू शकतो.तुम्ही प्लीज तुमच्या मित्राला आधी वाचवा!" त्याचे नातेवाईक देखील म्हणाले "सर, आम्हाला काही प्रॉब्लेम नाही. टाके नंतर टाकले तरी चालतील पण तुमच्या मित्राकडे आधी लक्ष द्या." माणुसकीचं हे दर्शन माझ्यासाठी नवीन होतं .
कॅज्युअल्टीमधील सर्व पेशंट संपेपर्यंत अमनदीपची बॉडी आता शवागृहात पाठवली गेली होती.
एव्हाना सकाळ झाली होती. सर्व सिनिअर डॉक्टर्स तसेच डीन डॉ. लहाने सर सकाळपर्यंत कॅज्युअल्टीमधेच बसून होते. त्यांनी सर्व कायदेशीर बाबींमध्ये स्वतः जातीने लक्ष घातलं होतं.आता सर्व सिनिअरनी मुलांना रूमवर जाऊन फ्रेश व्हायला सांगितलं . काहीजणांकडे अमनदीपच्या परिवाराच्या संपर्कात रहाण्याची जबाबदारी दिली आणि विमानतळावरून त्यांना इथे घेऊन येण्याची व रहाण्याची व्यवस्था केली गेली .
डॉ. वर्णन वेल्हो सरांनी मला बोलावून सांगितलं की, "आज ऑपरेशनसाठी रेग्युलर पेशंट्स ठेवू नका. आजच्या पेशंटची ऑपरेशन्स उद्या करूया. फक्त जे पेशंट इमर्जन्सी आहेत किंवा सिरिअस आहेत त्यांचीच ऑपरेशन्स आज ठेवा. पूर्ण ॲनेस्थेशिया डिपार्टमेंट रात्रभर इथंच आहे. त्यांना मानसिक धक्क्यातून सावरायला थोडा वेळ द्यायला हवा." सराना ठीक आहे म्हणून मी रूमवर परत आलो.
डोकं जड झालं होतं. त्याचे आईवडील कुठेपर्यंत पोहोचले असतील ? ते या मृत शरीराला बघू शकतील का? डेड बॉडी परत कसे घेऊन जातील ? पुढचं आयुष्य कुणाकडे बघून जगातील ?विचार बंद झाले होते. समोर टेबलावर मिसेसनी चिठ्ठी लिहून ठेवली होती. "अमनदीप बरा आहे ना? फोन करा प्लीज!तुमचा फोन लागत नाही.मी ड्युटीसाठी निघते आहे ." काय सांगणार होतो मी त्यांना? इतक्यात मला ऑपरेशन थिएटरमधून फोन आला. सिस्टर बोलत होत्या. मी त्यांना म्हणालो "सिस्टर सॉरी, मी सांगायला विसरलो. आज कुठलीही रुटीन केस (ऑपरेशन) होणार नाही. सर्व ॲनेस्थेशिया डिपार्टमेंट आतापर्यंत कॅज्युअल्टीमध्येच होतं . मी वॉर्डमध्ये फोन करून सांगतो की, कुठलाही पेशंट ऑपेरेशनसाठी पाठवू नका. फक्त इमर्जन्सी केसेस करू!"
पण त्या म्हणाल्या "सर, पण OT (ऑपरेशन थिएटर ) मध्ये सगळे ॲनेस्थेटिस्ट आलेत. त्यांनी पेशंट पण बोलावून घेतलाय! " काय ? माझा मलाच विश्वास बसेना. मी तोंड धुवून तसाच OT मध्ये गेलो.
OT मध्ये आल्या आल्या एक ॲनेस्थेशिया रेसिडेंट ( शिकाऊ डॉक्टर ) समोर आला व म्हणाला,` "सर दोन्ही पेशंट ओ.टी.मध्ये बोलावलेत. कुठला पेशंट पहिल्यांदा चालू करायचा?"
रडून रडून त्याचे डोळे सुजले होते. तरी देखील तो अगदी निर्विकारपणे मला हे विचारत होता. मी निमुटपणे त्यातल्या एका पेशंटकडे बोट दाखवलं. पेशंटला ऑपरेशनला न्यायच्याआधी आम्ही पेशंटच्या नातेवाईकांना भेटायला बोलावले. ते देखील म्हणाले,"सर काल रात्रभर तुम्ही सगळे कॅज्युअल्टीमध्येच होता. आम्ही बघितलं, आमच्या पेशंटचं ऑपरेशन उद्या केलं तरी चालेल. आमची काही तक्रार नाही! "
एरवी हेच नातेवाईक आमच्या मागे लागायचे की 'आमच्या पेशंटचे ऑपेरेशन लवकर करा म्हणून!' एकंदरीत सर्वच अनपेक्षित घडत होत. आज ऑपरेशन केली नसती तरी फार काही बिघडलं नसतं, तरी पण हे काय चालू आहे काहीच समजेना . मी सिस्टरना जाऊन विचारलं, त्या म्हणाल्या "काही माहित नाही सर. पण सर्व ॲनेस्थेटिस्ट म्हणालेत कोणतीच केस (ऑपरेशन) कॅन्सल करायची नाही म्हणून!" पुढच्या तासाभरात त्यांनी दोन्ही पेशंटना भूल दिली व ऑपरेशन सुरु झाले. ऑपरेशन करण्याची मनस्थिती नव्हती! तरी पण एकदा का ऑपरेशन सुरु झालं की इतर सर्व गोष्टींचा विसर पडतो. तसंच झालं. माझं ऑपरेशन संपता संपता संध्याकाळचे ६ वाजले होते . दोन्ही पेशंट व्यवस्थित झाले व मी बाहेर सर्जन रूम मध्ये येऊन बसलो. सिस्टरनी चहाचा कप माझ्यासमोर ठेवला व म्हणाल्या, " घ्या,दमला असाल!"
एव्हाना दोन्ही पेशंट I.C.U. मध्ये शिफ्ट झाले आणि पेशंटबरोबर ॲनेस्थेटिस्टही बाहेर पडले. त्यातला एक जण येऊन मला म्हणाला, "सर दोन्ही केसेस चांगल्या झाल्या. चला, निघतो. बाय!" आणि तो निघाला.
आता मात्र मला हे सर्व काही सहन होईना. अपराध्यासारखं वाटत होतं. आम्ही त्यांच्या मित्राला वाचवू शकलो नाही म्हणून ते माझ्याशी असे वागत असावेत असं वाटत होतं. मी त्याला हाक मारली व म्हणालो "का ? कशासाठी ? आज ऑपरेशन नसते केले तर काय बिघडलं असत का?" तो काही न बोलता तसाच परत निघाला. मी त्याला परत बोललो " अरे कशासाठी हा अट्टाहास ? काय गरज होती आज ऑपरेशन करायची? "
आता मात्र तो थांबला, माझ्यासमोर येऊन बसला आणि त्याने मान खाली घातली. डोळ्यात पाणी दाटून आलं होतं. मी त्याच्या पाठीवरून हात फिरवला. तो म्हणाला, " सर , अमनदीप सर माझे सिनिअर होते. HE WAS ONE OF THE BEST .ते सर्वात हार्डवर्किंग आणि ऑनेस्ट होते. कुठलीच केस ते पोस्टपोन होऊ द्यायचे नाहीत. कधीकधी मला त्यांचा राग पण यायचा. कारण ते कॉल डायरेक्टर असले की, रात्रभर केसेस चालायच्या.स्वतः पण काम करायचे आणि आम्हाला पण काम करायला लावायचे."
"सर तुम्हाला माहित आहे का ? आज आपल्या हॉस्पिटलच्या सर्व डिपार्टमेंटच्या मिळून जवळजवळ ३०-३५ केसेस झाल्या असतील ! आम्ही एक पण केस कॅन्सल होऊ दिली नाही!"
मी परत विचारलं , "अरे पण का ? हे सगळं कशासाठी? "
तो म्हणाला, "अमनदीप सर जर कुठे असतील आणि आम्हाला बघत असतील तर त्यांना काय वाटलं असतं! त्यांच्यामुळे आम्ही सगळ्या केसेस कॅन्सल केल्या म्हणून ? आम्हाला सकाळी सिनिअरनी सांगितलं होतं की आज सुट्टी घ्या म्हणून. पण आम्ही सर्वांनी ठरवले की, नाही! आज केसेस कॅन्सल नाही होऊ द्यायच्या."
" आज झालेल्या या सगळ्या केसेस हीच अमनदीप सरांना आमच्याकडून खरी श्रद्धांजली ! आदरांजली!!"
एवढे बोलला आणि तो निघून गेला. मी बराचवेळ त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत होतो. कपातला चहा तसाच ठेऊन मी देखील ऑपरेशन थिएटरमधून बाहेर पडलो.
त्या दिवशी जे.जे.हॉस्पिटलमध्ये जे घडलं ते अद्भुत आणि अनाकलनीय होतं.मनातल्या मनात मी जे.जे च्या पूर्ण ॲनेस्थेशिया टीमला सलाम केला. तसं बघितलं तर हे सर्वच ॲनेस्थेटिस्ट माझ्यासाठी' सायलेंट हिरोज् 'आहेत कारण कुठलंही ऑपरेशन यशस्वी करण्यामध्ये सर्जनचा जेवढा सहभाग असतो तेवढाच यांचा देखील असतो. हे लोक पेशंटला बेशुद्ध करतात. पूर्ण ऑपरेशन चालू असताना पेशंटच्या प्रत्येक प्रक्रियेला कंट्रोल करतात आणि ऑपरेशन नंतर पेशंटला अलगद शुद्धीवर आणतात. ऑपरेशन चांगलं झाल्याचं सर्व श्रेय शक्यतो सर्जनलाच मिळतं. ऑपरेशन चांगल झाल्यावर डिश्चार्ज घेऊन घरी जाताना बरेच पेशंट आणि नातेवाईक सर्जनचेच आभार मानतात. परंतू मी आज पर्यंत कधी कुठल्या नातेवाईकांनी ॲनेस्थेटिस्टचे आभार मानताना बघितले नाही.बऱ्याच पेशंटना तर त्यांना कोणी भूल दिली त्या डॉक्टरांचे नाव देखील माहित नसतं. तरीदेखील कशाचीही अपेक्षा न करता, रोज नव्या उत्साहात नवीन केसेससाठी हे ॲनस्थेटिस्ट तयार असतात. हे लोक आपलं काम अतिशय चोखपणे बजावतात. त्यामुळे माझ्यासाठी हे लोक पडद्यामागचे "सायलेंट हिरोज्" आहेत!



डॉ. प्रवीण सुरवशे
संपर्क क्र. 7738120060

आणि तसाच विचार केला तर प्रत्येक डॉक्टरचं आयुष्य असंच आहे. प्रत्येक डॉक्टरच्या आयुष्यात बऱ्याच अडचणी असतात .कुणाला कौटुंबिक समस्या, तर कुणाला शारीरिक तक्रारी , तर कोणाला अर्थिक अडचणी असतात . प्रत्येक डॉक्टर स्वतःच्या खाजगी आयुष्यात एक वेगळीच लढाई लढत असतो पण डॉक्टरांकडे ज्यावेळी पेशंट येतो, त्यावेळी आपल्या वैयक्तिक अडचणीं चेहऱ्यावर न दाखवता , प्रत्येक डॉक्टर आपल्या पेशंटला बरे करण्याचा प्रयत्न करत असतो. आणि खरं सांगायचं तर या सर्वांच्या आयुष्यात कितीही अडचणी असल्या तरी आपला पेशंट बरा होऊन घरी जातोय या एकाच गोष्टीमध्ये या लोकांना खरं सुख सापडतं!
मी माझ्याच विचारात कधी होस्टेलपर्यंत आलो कळलंच नाही. होस्टेलच्या लॉबीमध्ये अमनदीपच्या श्रद्धांजलीचा कार्यक्रम झालेला दिसत होता. त्याचा फोटो लावला होता व फोटोला फुले वाहिलेली दिसत होती. माझे देखील हात आपोआप जुळले आणि मी नमस्कार केला. फोटोमध्ये किती सुंदर आणि हसरा दिसत होता तो. त्याच्या नजरेला नजर देण्याचे धाडस नाही झालं माझं! त्याची नजर चुकवून जायला निघालो आणि लिफ्टचे दार उघडले ,एवढ्यात आवाज आला.
"अरे किधर जा रहे हो सर? आज मैं ही कॉल डायरेक्टर हूँ! कितने भी केसेस आने दो,कोई टेन्शन नही.सारे केसेस कंरेंगे!"

# स्वामीकृपा



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

**अहमदनगर जिल्ह्यातील खेडगाव हे एक छोटंसं गाव. या गावात शेतकरी, शेतमजुरी करणारी बहुतेक कुटुंबे गुण्यागोविंदाने नांदत होती. अशा कुटुंबांपैकी एक होतं देशमुख कुटुंब. या कुटूंबात आईवडील, एक मुलगा, एक मुलगी आणि आजी आजोबा असे सहा जण. वडील साहेबराव तलाठी म्हणून काम करीत. आई गृहिणी होती. मोठी मुलगी रेश्मा आणि तिच्यापेक्षा लहान असलेला राहुल. नाही म्हणायला देशमुख कुटुंबीयांची थोडीशी शेती होती, पण त्यातून फारसे उत्पन्न हाती लागत नव्हते. पण अशा सामान्य परिस्थितीतही देशमुख कुटुंबीयांनी आपल्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून खूप प्रयत्न केले होते. त्यांना शिक्षणासाठी पैसे कमी पडू नयेत म्हणून आई घरखर्चात काटकसर करून पैसे वाचवायची.**

वडीलही बाहेरची दोन कामे जास्त कामे करून दोन पैसे अधिक मिळावेत म्हणून धडपडत असत. देशमुख कुटुंबीयांची परिस्थिती सामान्य असली तरी संस्काराची श्रीमंती मोठी होती. आपल्या कष्टाच्या कमाईचाच पैसा घरात यावा यासाठी साहेबराव दक्ष असत. घरातले वातावरण धार्मिक होते. रेश्माच्या आईची स्वामी समर्थांवर अपार श्रद्धा होती. रेश्माच्या आईने रेश्माला अभ्यासासोबतच घरकाम आणि स्वयंपाकातही तयार केले होते. कधी कधी आई जर माहेरी गेली, तर रेश्मा तिची उणीव भासू द्यायची नाही. ती उत्तम स्वयंपाक करून सगळ्यांना जेवू घालायची. तिच्या हाताला कमालीची चव होती.

रेश्मा आणि राहुल दोघं भावंडं अभ्यासात हुशार होती. त्यांचा शाळेत नेहमी पहिल्या पाचात नंबर असायचा. रेश्मा बारावी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली. जवळच्याच कॉलेजात तिने बी ए साठी प्रवेश घेतला. रेश्मा मुळातच देखणी असल्याने तिला बारावीपासूनच स्थळे चालून येऊ लागली होती. बी ए च्या शेवटच्या वर्षाला असताना तिला नगरच्या पाटलांच्या मुलाचे, नितीनचे स्थळ आले. नितीन इंजिनिअर झालेला होता. दिसायला उत्तम होता. परंतु सध्याच्या कठीण काळात त्याला चांगली नोकरी मिळणे दुरापास्त झाले होते. मुंबईला एका कंपनीत कमी पगारावर त्याला काम मिळाले होते. पण सुरुवात तर करू या. अनुभवाच्या जोरावर पुढे चांगले काम मिळेल या आशेवर तो ते काम करीत होता. नितीनचे आईवडील रेश्माच्या घरी येऊन तिला पाहून गेले आणि हुशार चुणचुणीत असलेली रेश्मा सून म्हणून त्यांना आपल्या मुलासाठी पसंत होती. मग नितीन आणि रेश्मा यांचीही भेट झाली. पहिल्या भेटीतच दोघांनी एकमेकांना पसंती दिली. नितीन आणि रेश्मा जोडीही छान दिसत होती. दोघेही एकमेकांना अनुरूप होते. यथावकाश योग्य मुहूर्त पाहून देशमुख आणि पाटील कुटुंबीयांनी त्यांचे लग्न करून दिले आणि रेश्मा सून म्हणून पाटील कुटुंबियांच्या घरी आली .

सुरुवातीचे काही महिने छान गेले. नव्या सुनेचे कोडकौतुक झाले. पण नांतर घरात वादाला सुरुवात झाली. रेश्माची नणंद लग्न होऊन त्याच गावात राहत होती. तिचे सारखे घरी येणेजाणे सुरु असायचे. ती घरी आली की रेश्माची सासू आणि तिच्या तासनतास एका खोलीत गप्पा चालायच्या. घरामध्ये शेती आणि प्रॉपर्टीचे वाद सुरु झाले. रेश्माच्या नणंदेने आपल्या आईचे असे काही कान भरले की तिला सुरुवातीला आवडलेली ही सून घरात नकोशी झाली. याची परिणीती रेश्माला त्रास देण्यात होऊ लागली. मुळात सोशिक असलेली रेश्मा चकार शब्द न काढता हे सगळे सहन करत होती. कारण नितीनला मुंबईला चांगली नोकरी नव्हती. घर नव्हते. पण एकदा त्याच्या आईनेच नितीनला घरी बोलावून घेतले आणि हिला तुझ्या सोबत काही करून मुंबईला घेऊन जा असे सांगितले.

नितीनने रेश्माची समजूत घातली. मी घर बघेपर्यंत इथे थांब. घर मिळाले की लगेच मी येऊन तुला घेऊन जाईन असे सांगितले. आणि लवकरच त्याला मुंबईच्या एका उपनगरात एक वन रम किचन भाड्याने मिळाले. तो गावी येऊन रेश्माला घेऊन निघाला. निघताना सासूने फारसे सामान घेऊ दिले नाही. देव्हाऱ्यातील अन्नपूर्णेची मूर्ती आणि स्वामी समर्थांची प्रतिमा तिने रेश्माच्या हातात ठेवल्या. स्वाभिमानी आणि समाधानी असलेल्या रेश्माने त्यांचा आनंदाने स्वीकार केला आणि दोघेही मुंबईला आली . हळूहळू त्यांची घडी बसू लागली. पण मुंबईला असलेली महागाई आणि नितीनला असलेला कमी पगार यामुळे दोघांची ओढाताण होऊ लागली. घर चालवणे कठीण होऊ लागले. एक दिवस रेश्मा नितीनला म्हणाली, ' अहो, मी सुद्धा काही काम करून आपल्या संसाराला हातभार लावावा असे म्हणते.

' नितीन म्हणाला, ' हरकत नाही. पण तू काय काम करणार ? इकडे तुला चांगली नोकरी मिळेल याची खात्री नाही. मी इंजिनिअर असूनही कमी पगारावर काम करतो आहे. '


रेश्मा म्हणाली, ' तुम्ही नेहमी म्हणता ना, की तुझ्या हाताला चव आहे म्हणून. मग मी स्वयंपाकाच्या ऑर्डरी घेत जाईन. लोकांच्या मागणीप्रमाणे त्यांना हवे ते पदार्थ बनवून देईन. आणि एकदा नाव झाले की हळूहळू कामे मिळत जातील. '

नितीन म्हणाला, ' पण तू स्वयंपाकाचे काम करणार ? मला योग्य नाही वाटत. '

रेश्मा म्हणाली, ' काय हरकत आहे ? कामात कसली आली आहे लाज ? कोणतेही काम सुरुवातीला छोटे वाटते पण एकदा सुरुवात झाली की हळूहळू काम वाढत जाते. आपलं काम चांगलं असलं की लोकांचा विश्वास वाढायला लागतो. व्यवसाय नावारूपाला येतो. '

नितीन म्हणाला, ' ठीक आहे. तुला योग्य वाटेल तसे कर. '

रेश्माने स्थानिक वर्तमानपत्रातून आपल्या या छोट्या व्यवसायाची जाहिरात केली. घराच्या बाहेर बोर्ड लावला. एक नवी आशा , नवा हुरूप तिला मिळाला. जाहिरात करून काही दिवस होऊन गेले पण अजून म्हणावे तसे काम मिळत नव्हते. रेश्माच्या घराजवळच रंजनाताईंचा बंगला होता. तिथे सकाळी, संध्याकाळी काही मंडळी जाताना दिसत. रेश्माने त्याबद्दल लोकांना विचारले तेव्हा तिला कळले की त्याच बंगल्यात स्वामी समर्थांची एक मोठी प्रतिमा ठेवलेली असून लोक त्याठिकाणी त्यांची भक्ती करण्यासाठी, दर्शन घेण्यासाठी जातात. सकाळ, संध्याकाळ स्वामींची पूजा, आराधना, नैवेद्य , आरती आदी सोपस्कार होतात. रेश्माला हा शुभशकुन वाटला. आपल्या घराजवळ स्वामी समर्थांचा निवास आहे, ही गोष्ट तिला खूपच आनंद आणि समाधान देणारी ठरली. त्या दिवशी संध्याकाळी ती दर्शनासाठी तेथे जाऊन आली . तेथे खूपच प्रसन्न वाटले. रंजनाताई तर अतिशय प्रेमळ होत्या. त्यांनी रेश्माची मोठ्या आस्थेने चौकशी केली आणि तिला येथे येत जा म्हणून सांगितले. दुसऱ्या दिवशी गुरुवार होता. रेश्माने मेथीचे लाडू बनवण्याचे ठरवले होते. तिच्या मनात आले की स्वामींना मेथीच्या लाडूंचा नैवेद्य दाखवावा. पण कडू मेथीचे लाडू स्वामींना चालतील का असं तिने रंजनाताईंना विचारलं. त्या म्हणाल्या, ' स्वामी म्हणजे माउली. त्यांना प्रेमाने तू जे देशील त्याचा ते स्वीकार करतील. ' हे ऐकून रेश्माला मोठा आनंद झाला.



रात्री नितीन घरी आल्यावर तिने ही सगळी हकीगत त्याला सांगितली. त्यालाही खूप आनंद झाला. दुसऱ्या दिवशी रेश्माने लवकर उठून सगळी कामे आटोपली आणि स्वामींसाठी मेथीचे लाडू मोठ्या मनोभावे बनवले. रंजनाताईंनी तिला सकाळी बारा वाजेच्या आत नैवेद्य घेऊन ये असे सांगितले होते. कारण एकदा स्वामींचे नैवेद्य, जेवण आणि विदा झाला की नंतर ते काही घेत नाहीत. म्हणून तिची धावपळ सुरु होती. ती आता तयार होऊन निघणार, तेवढ्यात तिला एक फोन आला. एका ताईंची नुकतीच डिलिव्हरी झाली होती आणि त्यांना मेथीच्या लाडवांची तातडीने आवश्यकता होती. तेव्हा तिला आता मोठा प्रश्न पडला. त्या आईला मेथीचे लाडू देणे जास्त गरजेचे आहे, असे तिला वाटले आणि तिने मनोमन स्वामींची क्षमा मागून ते लाडू त्या बाईला नेऊन दिले. रंजनाताईंना भेटून तिने त्याबद्दल सांगितले. त्या म्हणाल्या हरकत नाही. त्या बाईंची गरज आधी भागवली ते छान झाले. रेश्मा म्हणाली, ' पुढच्या गुरुवारी मी स्वामींसाठी डिंकाचे लाडू घेऊन येईन. 'आता रेश्माला स्वामींच्या कृपेने कामाच्या ऑर्डर्स मिळणे सुरु झाले होते. होता होता गुरुवार आला. रेश्माने स्वामींना कबूल केल्याप्रमाणे डिंकाचे लाडू बनवले. पण यावेळीही मागच्या सारखेच घडले. ती लाडू घेऊन नैवेद्य दाखवायला जाणार, तोच तिला एका घरून डिंकाच्या लाडवांची ऑर्डर आली. ती व्यक्ती आजारी असून डॉक्टरांनी तिला डिंकाचे लाडू घेण्याचा सल्ला दिला होता. मागच्या वेळेप्रमाणे यावेळीही रेश्माने मानवसेवा महत्वाची मानून स्वामींसाठी केलेले लाडू त्या व्यक्तीला नेऊन दिले. आता मात्र तिचे मन तिला खात होते. आपल्या हातून स्वामींची अपेक्षित सेवा घडली नाही याची तिला खंत होती. रंजनाताईंजवळ तिने मोकळे केले. त्या पुन्हा म्हणाल्या, ' स्वामी खूप दयाळू आहेत. ते रागावत नाहीत. तू अडलेल्याला मदत केलीस याचा त्यांना आनंदच होईल. ' आता मात्र पुढच्या गुरुवारी स्वामींचा नैवेद्य चुकू द्यायचा नाही असे तिने मनोमन ठरवले.

आता स्वामीकृपेने रेश्मा आणि नितीनचा संसार सुखात चालला होता. लवकरच गुरुवार आला. आता तिने स्वामींना नैवेद्य म्हणून मागच्या गुरुवारचे मेथीचे आणि डिंकाचे मिळून एकत्र लाडू बनवून अर्पण करायचे ठरवले. आजच तिला एक वाजता एका ठिकाणी मिटिंगसाठी जायचे होते. त्या ठिकाणी तिला एक ऑर्डर मिळणार होती. शिवाय संध्याकाळी पाच वाजता देखील एका ठिकाणचे बोलावणे आले होते. त्या ठिकाणी देखील काही ऑर्डर मिळण्याची शक्यता होती. सकाळी लवकर उठून तिने घाईघाईने सगळी कामे आवरली. नितीनला डबा तयार करून दिला. आणि स्वामींना नैवेद्य दाखवून पुढे तसेच मीटिंगला जाण्याच्या दृष्टीने तयारी केली. आता साडेअकरा झाले होते. घाईघाईत तिने आपली बॅग उचलली आणि घराला कुलूप लावून बाहेर पडली.

आज ठरल्याप्रमाणे स्वामींना आपण नैवेद्याचे लाडू अर्पण करणार याचा तिला कोण आनंद झाला होता. तिथे गेल्यानंतर तिने स्वामींना नैवेद्य ठेवण्यासाठी आपली बॅग उघडली आणि तिला धक्काच बसला. तिला लक्षात आले की आपण निघण्याच्या घाईत तो लाडवांचा डबा किचन ओट्यावरच विसरून आलोय. तेवढ्यात एक आजी तिथे आल्या. त्या आजीनी स्वामींना नैवेद्य म्हणून मेथीचे आणि डिंकाचे लाडू आणले होते. मग स्वामींना त्या लाडवांचा नैवेद्य दाखवण्यात आला. मग आरती होऊन तेथे जमलेल्या उपस्थिताना प्रसाद वाटण्यात आला. स्वामींजवळ जे डिंक आणि मेथीचे लाडू नैवेद्य म्हणून ठेवले होते, ते रंजनाताईंनी उचलले. त्यांना असे दिसले की एका लाडवावर एक बदाम खोचलेला होता, तो बदाम आता नाहीसा झाला होता. त्यांनी त्या आजींना सांगितले की आज तुमच्या नैवेद्याचा स्वीकार स्वामींनी केला आहे. हा चमत्कार पाहून सगळ्यांनाच मोठा आनंद आणि आश्चर्य वाटले आणि सगळ्यांनी भक्तिभावाने स्वामींना हात जोडले. रेश्माला वाटले आज आपण लाडू आणले असते तर, आपलाही नैवेद्य स्वामींनी ग्रहण केला असता. या विचाराने मन जरा खट्टू झाले. तिची नाराजी पाहून रंजनाताईंनी तिची समजूत घातली. त्या म्हणाल्या, ' तू सगळे मनोभावे करते आहेस. स्वामी निश्चितच तुझा नैवेद्य स्वीकारतील. तू नाराज होऊ नकोस. '

रेश्मा पुढे आपल्या नियोजित मीटिंगसाठी गेली. ती मीटिंग जरा लांबली पण तिला एका पार्टीची ऑर्डर मिळाली. संध्याकाळच्या मीटिंगमध्ये तिला एका साखरपुड्यासाठी ऐंशी लोकांच्या जेवणाची ऑर्डर मिळाली. त्या आनंदातच ती घरी आली. संध्याकाळी नितीन घरी आल्यावर तिने त्याला सगळी हकीगत सांगितली. नितीन म्हणाला, ' स्वामीकृपेने आपल्याला काम मिळाले आहे ही खूप चांगली गोष्ट आहे. आता आपण जेवणाच्या आधीच घरी स्वामींना नैवेद्य दाखवू. आणि मग जेवण करू या. तिलाही हा विचार आवडला. दोघांनीही शुचिर्भूत होऊन स्वामींना लाडवाचा नैवेद्य दाखवण्यासाठी डबा उघडला आणि काय आश्चर्य..! रेश्माने एका लाडवाला खोचलेला बदाम नाहीसा झालेला होता, त्या लाडवाचा एक घास कोणीतरी खाल्लेला दिसत होता. घरात तर कोणीच नव्हते. मग रेश्माच्या लक्षात आले की रंजनाताईंकडे ज्या आजी मेथीचे आणि डिंकाचे लाडू घेऊन आल्या होत्या, त्या दुसऱ्या तिसऱ्या कोणी नसून त्यांच्या रूपाने स्वामी माऊलीच त्या ठिकाणी आली होती. रेश्माचा राहिलेला नैवेद्य स्वामींनी अशा तऱ्हेने स्वीकारला होता. रेश्माचे डोळे आता भरून आले होते. स्वामींचे आभार कसे मानू असे तिला झाले. आपली श्रद्धा मनापासून असली तर ती स्वामींपर्यंत पोहोचतेच याचा साक्षात्कार तिला झाला होता. भक्तांच्या पाठीशी स्वामी माउली उभी असतेच. तिला फक्त शुद्ध भक्ती हवी असते. मानवसेवा हिच ईश्वरसेवा असते हाही संदेश माउलींनी या घटनेतून दिला होता. रेश्माला स्वामींचे वचन आठवले.

अनन्यश्चित्यतो मां ये जनः पर्युपासते !
तेषां नित्यभियुक्तांना योगक्षेमं वहाम्यहं !!

मला अनन्य भावाने शरण येऊन जो माझी भक्ती करतो, त्याचा योगक्षेम मी चालवितो.

# विश्वविजयापासून भारत दोन पावले दूर



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील उपांत्य लढतीत भारत विजय मिळवू शकतो कारण इंग्लंडपेक्षा भारताचा संघ वरचढ आहे. फलंदाजी आणि गोलंदाजी त्यातही फिरकी गोलंदाजीत भारत इंग्लंडपेक्षा वरचढ आहे आणि ही लढत आडीलेडमध्ये आहे तेथील खेळपट्टी फिरकीला साथ देणारी असल्याने भारताची बाजू वरचढ ठरते. शिवाय आडीलेडला विराट कोहलीची बॅट तळपते त्यामुळे हा सामना जिंकेल आणि त्यानंतर अंतिम फेरीही जिंकून भारत विश्वविजेता होऊ शकतो. विश्वविजेतेपदापासून भारत केवळ दोन पावले दूर आहे. भारतीय संघाला शुभेच्छा!**

ऑस्ट्रेलियात खेळली जाणारी टी २० विश्वचषक स्पर्धा आता अंतिम टप्प्यात आली असून स्पर्धेतील सर्वोत्तम चार संघ उपांत्य फेरीत पोहचले आहेत. अपेक्षेप्रमाणे भारत, पाकिस्तान, न्यूझीलंड आणि इंग्लंड हे चार संघ अंतिम चारमध्ये पोहचले असून ९ तारखेला पाकिस्तान विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात पहिली उपांत्य लढत होणार असून १० नोव्हेंबरला दुसरा उपांत्य लढत भारत आणि इंग्लंड यांच्यात होणार आहे. दोन्ही सामन्यातील विजयी संघ १३ तारखेला एकमेकांशी विजेतेपदासाठी झुंजतील. उपांत्य फेरीसाठी पात्र ठरलेल्या चार संघापैकी भारत आणि न्यूझीलंड हे दिमाखदार खेळ करत उपांत्य फेरीत पोहचले अर्थात भारताचा उपांत्यफेरी पर्यंतचा प्रवास दिमाखदार वाटत असला तरी तो तितका सोपा नव्हता हे ही तितकेच खरे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेली रोमहर्षक लढत भारताने जिंकली असली तरी एकवेळ भारताच्या हातातून सामना पूर्णपणे निसटला होता. ४ बाद ३२ अशा अवस्थेतून विराट कोहलीने हार्दिक पांड्याला हाताशी धरुन भारताला अशक्यप्राय विजय मिळवून दिला. बांगलादेश विरुद्धची लढतही रोमहर्षक झाली बांगलादेशचा सलामीवीर लिटन दासने बांगलादेशला तुफान सुरवात करुन दिल्यानंतर भारताच्या मदतीला पाऊस आला आणि भारत तो सामना जिंकला. न्यूझीलंड मात्र अगदी दिमाखात उपांत्य फेरीत पोहचला. इंग्लंडही सुधारित रनरेटच्या जोरावर उपांत्य फेरीत पोहचला. पाकिस्तान उपांत्यफेरीत पोहचला या गोष्टीवर खुद्द पाकिस्तानच्या खेळाडूंचाही विश्वास बसत नसेल कारण पाकिस्तान या स्पर्धेतून बाद झाला होता. पाकिस्तानच्या खेळाडूंनी कराचीचे तिकीटही काढले होते पण म्हणतात ना क्रिकेटमध्ये काहीही होऊ शकते तसेच रविवारी झाले. रविवारी दक्षिण आफ्रिका विरुद्ध नेदरलँड यांच्यात सामना होता. दक्षिण आफ्रिका या स्पर्धेत एक बलवान संघ म्हणून पुढे आला होता. त्यांचे सर्व खेळाडू फॉर्ममध्ये होते भारतालाही त्यांनी नमवले होते त्यामुळे नेदरलँड सारख्या दुबळ्या संघाविरुद्ध ते एकतर्फी विजय मिळवून उपांत्यफेरीत पोहचतील अशी असे वाटत असतानाच दक्षिण आफ्रिकेने माती खाल्ली आणि नेदरलँड विरुद्ध पराभव स्वीकारला. चोकर्स ही दक्षिण आफ्रिकेला दिलेल्या उपाधीला दक्षिण आफ्रिका यावेळीही जागली. कारण मोठ्या स्पर्धेत ऐनवेळी पराभव स्वीकारून स्पर्धेबाहेर होण्याचा त्यांना सवयच झाली आहे. टी २० विश्वचषक असो की एकदिवसीय विश्वचषक असो दक्षिण आफ्रिका नेहमी बलवान संघ म्हणून पुढे येतो आणि मोक्याच्या वेळी कच खातो आणि स्पर्धेबाहेर जातो म्हणूनच त्यांना चोकर्स असे म्हटले जाते यावेळीही तेच झाले. नेदरलँड विरुद्ध दक्षिण आफ्रिकेचा पराभव झाला आणि पाकिस्तानला लॉटरी लागली. कराचीला जाण्याची तयारी करणारे पाकिस्तानचे खेळाडू मेलबर्नला जाण्याची तयारी करू लागली. रडतखडत का होईना पाकिस्तान उपांत्य फेरीत पोहचला असला तरी तो आता आणखी धोकादायक झाला आहे कारण ज्यावेळी त्यांना नशिबाने उपांत्यफेरीत संधी मिळते त्यावेळी ते विजेतेपद मिळवतात असा त्यांचा इतिहास आहे. १९९२ साली देखील ते असेच स्पर्धेबाहेर गेले होते पण नशिबाने साथ दिली आणि ते उपांत्यफेरीत पोहचले पुढे ते विश्वविजेता बनले. अर्थात उपांत्यफेरितील त्यांचा प्रतिस्पर्धी न्यूझीलंड संघ बलवान असून पाकिस्तानला त्यांच्या विरुद्ध विजय मिळवणे सोपे जाणार नाही.

# सत्तारांना बडतर्फ करा, नाहीतर राष्ट्रवादी गप्प बसणार नाही

## प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील : राष्ट्रवादीच्या शिष्टमंडळाने राज्यपालांची घेतली भेट

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** जोपर्यंत अब्दुल सत्तार यांना मंत्रीमंडळातून बडतर्फ करत नाही तोपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस गप्प बसणार नाही अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी व्यक्त केली. अब्दुल सत्तार यांना मंत्रीमंडळातून तात्काळ बडतर्फ करावे यासाठी आज राष्ट्रवादीच्या शिष्टमंडळाने राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांची भेट घेऊन मागणी केली.

मंत्री अब्दुल सत्तार यांनी आमच्या खासदार सुप्रियाताई सुळे यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करून पुन्हा एकदा खालचा स्तर दाखवला आहे. मंत्रीमंडळात असणाऱ्या अशा जबाबदार मंत्र्याने अशी भाषा वापरणे आणि भारतातील संसदेत काम करणाऱ्या एका महिला खासदाराबाबत अशाप्रकारे बोलणे कितपत योग्य आहे. सत्तार यांच्या या वक्तव्याचा सर्व स्तरावर निषेध होत आहे. त्यामुळे त्यांना मंत्रिमंडळातून बडतर्फ करण्याची मागणी केल्याचे जयंत पाटील यांनी माध्यमांशी बोलताना



सांगितले. अब्दुल सत्तार यांची ही भाषा पहिलीच नाही. यापूर्वी त्यांनी जिल्हाधिकारी यांना दारु पिता का असा प्रश्न विचारला होता.आता एखाद्या महिलेबाबत बोलणे, त्या संसदेत अतिशय पोटतिडकीने बोलतात त्यांच्याबाबत बोलणे ही तर हद्दच झाली आहे. मंत्र्यांनी काही मर्यादा सांभाळायच्या असतात परंतु या मर्यादांचा वारंवार हे मंत्री उल्लंघन करत आहेत त्यामुळे त्यांना बडतर्फ करण्यात यावे अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे असेही जयंत पाटील यांनी सांगितले. राज्यपाल हे सर्वोच्च आहेत. सरकार ऐकत नसेल तर त्यांना आम्ही कैफियत मांडू शकतो. हा विषय माफी मागून संपणार नाही. हवे ते विधान करता मग माफी मागता हे महाराष्ट्रात चालणार नाही. सरकारमधील लोकांनी विचार करावा, त्यांना आपले सहकारी कसे हवेत. अब्दुल सत्तार यांच्यावर साधा गुन्हा दाखल केला जात नाही. मंत्री आहेत म्हणून पोलीस घाबरत असतील तर पोलिसांनी आपल्या कर्तव्यापासून चुकू नये, सरकारे येतात आणि सरकारे जात असतात असे आवाहनही जयंत पाटील यांनी केले. या सरकारमधील मंत्र्यांची महिलांविषयी काय भूमिका आहे, महिलांचा द्वेष कशापद्धतीने करतात, यांचा महिलाविषयी काय विचार आहे हे आता स्पष्ट झाले आहे. सरकारमधील मंत्री कसे असावेत याचा विचार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी करावा आणि मंत्र्याने जे वक्तव्य केले आहे ते देवेंद्र फडणवीस यांना मान्य आहे का? असा सवाल करतानाच मंत्र्यांची ही भूमिका भाजपला मान्य असेल तर बडतर्फ करणार नाही आणि मान्य नसेल तर धाडसाने सरकार येत जात असतात त्यामुळे कुणाकुणाला पदरात घ्यायचे व कुणाची ओझी उचलायची हे एकदा भाजपने ठरवले पाहिजे असा टोलाही जयंत पाटील यांनी लगावला. यावेळी शिष्टमंडळात माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, माजी मंत्री हसन मुश्रीफ, राष्ट्रीय प्रवक्ते क्लाईड क्रास्टो, मुंबई कार्याध्यक्ष नरेंद्र राणे, राखी जाधव, मुंबई युवती अध्यक्षा अदिती नलावडे, अल्पसंख्याक मुंबई अध्यक्ष सोहेल सुभेदार, दक्षिण मुंबई जिल्हाध्यक्ष महेंद्र पानसरे आदींचा समावेश होता.

# बाजार सावंगी परिसरात पंधरा दिवसांपासून चोरट्यांचा धुमाकूळ



आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** परिसरात गेल्या पंधरा दिवसांपासून चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून विहिरीवरील विद्युत पंप व जनावरे चोरी जाण्याचे सत्र सुरू आहे. सोमवार दि.07नोव्हेंबर रोजी रात्री तर येसगाव व मनिकनगर येथून 7 जनावरे चोरीला गेली आहेत. परिसरातील येसगाव, मनिकनगर येथील योगेश उत्तम पल्हाळ यांचा एक बैल, बाजार सावंगी शेतवस्तीवरील कैलास धुमाळ यांच्या दोन गाय, इसाक शेख यांची एक गाय, दादासाहेब खंडागळे यांचा एक बैल व दोन वासरी अशी जनावरे चोरी गेली असून शेत वस्तीवर राहणारे शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरी करण्याअगोदर चोरट्यांनी शेतवस्तीवर राहणाऱ्या आजूबाजूच्या घरांच्या दरवाज्याच्या बाहेरून कडी लाऊन घेतल्या होत्या. तसेच याअगोदर 26ऑक्टोबररोजी पारुबा दांगोडे यांची एक गाय चोरी गेली होती तेंव्हापासून दोन आठवडे झाले तरी अजून कुठलाच तपास लागलेला नाही. आणि तीन दिवसांपूर्वी सूर्यभान काटकर यांचे शेतातील विहिरीवरून कृषी विद्युत पंप चोरीला गेला त्याचाही तपास नाही. त्यामूळे शेतकरी त्रस्त झाले असून चोरीच्या भीतीने रात्र जागून काढत आहेत. गेल्या काही दिवसांपासून चोरीचे प्रकार घडत असून त्याचा कुठलाच तपास लागला नसून वारंवार चोरींच्या घटना वाढतच असल्याने सोमवारी रात्री सात जनावरे चोरी गेल्याने संतापलेल्या शेतकऱ्यांनी मंगळवार रोजी सकाळीच बाजार सावंगी पोलीस चौकी येथे गर्दी केली.व लवकरात लवकर चोरांचा तपास लाऊन आमची जनावरे मिळऊन द्यावी अशी मागणी निवेदनाद्वारे केली.काही शेतकरी शेतात जनावरे बांधून गावात घरी राहतात. तर काही शेतवस्तीवरच राहतात. सकाळी जनावरे जागेवर न दिसल्याने चोरी झाल्याचे शेतकऱ्यांच्या लक्षात आले. त्यांनी लगेच बाजार सावंगी पोलीस चौकी येथे माहिती दिली त्यानंतर पोलिसांनी चोरी झाल्याच्या ठिकाणी जाऊन पंचनामा केला. अगोदरच अती पावसामुळे शेतीचे पीक पुर्णपणे वाया गेले आहे अशा संकटात शेतकरी त्रस्त असताना त्यात जनावरे चोरी गेल्याने शेतकरी आणखी हवालदिल झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून विहिरीवरील विद्युत पंप चोरी जाण्याच्या घटना सुद्धा घडत आहेत.पोलीस निरीक्षक भुजंग हतमोडे व उपनिरीक्षक विजयकुमार वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली संजय सपकाळ, प्रकाश ठोकळ, दिलीप बनसोड हे पुढील तपास करत आहेत.

# पालकमंत्री भुमरे यांचा खुलताबाद तालुका भाजपातर्फे सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** औरंगाबादचे पालकमंत्री तथा रोजगार हमी व फळउत्पादक मंत्री भुमरे यांचा रत्नपूर तालुका येसगाव नं. 3 व 2 गावातील संवाद करण्यात आला असता भा. ज. पा पार्टीकडून त्यांचा शाल व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. त्यावेळी ग्रामपंचायत बिभक्त झाल्याने लवकरच नवीन बिल्डींग मंजूर करून देणार हे आश्वासन दिले. तसेच येसगाव नं 1 चे संजय खंडागळे यांची उपनिरीक्षक पदी पडन्नती झाल्याने भुमरे यांनी त्यांचा सत्कार केला व त्यांना पुढील वाटचालिस शुभेच्छा दिल्या. यावेळी भा. ज. पा ता. अध्यक्ष प्रकाश वाकळे, सभापती दिनेश अंभोरे, नवनिवीत सरपंच रेणुका अरुण खंडागळे, उपसरपंच गणेश दंगोडे, सतीश जाधव, विजय जाधव, प्रदीप पाथ्रे, दिलीप पाथ्रे, लताबाई खंडागळे, ग्रा. स. अशोक खंडागळे, भा. ज. पा किसान मोर्चा ता. अध्यक्ष मधुकर खंडागळे, ग्रा. स मंगलबाई खंडागळे, ग्रा.स फकिराव खंडागळे, ग्रा. स दादासाहेब खंडागळे, ग्रा. स कडुबा बकाल, बाजीराव खंडागळे, रोहिदास खंडागळे, ग्रामसेवक कुवर, कराळे आदी ग्रामस्थ हजर होते.





# ग्रुप ग्रामपंचायत दिनवाडाअंतर्गत सनव येथे विविध विकासकामांचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**सनव :** येथे विविध विकास कामाचे भूमिपूजन सरपंच गणेश ठोंबरे, महेश भाऊ गुजर, बबलू पोळ यांच्या हस्ते करण्यात आले. आमदार सतीश भाऊ चव्हाण यांच्या अल्पसंख्यांक निधी मधून सनव येथे मज्जित परिसरात व समाज मंदिर परिसरात पेवर ब्लॉक बसविणे कामाचे आज भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी उपस्थित सरपंच लहू शेजवळ, भाऊसाहेब शेजवळ, सुभाष सुराशे ,ग्रा. प सदस्य सिंधुबाई कांबळे, ग्रामसेवक गव्हाणे,सत्तर पटेल, हबीब शेख, जाबीर शेख, पोलीस पाटील कांबळे, शंकर पवार, हरिचंद्र केळकर, जुबेर पटेल, सुदर्शन कांबळे, कॉ. कीर्तिकर ग्रामस्थांची उपस्थिती होती.



# शिवसैनिक पक्षाची कवचकुंडले

## संपर्कप्रमुख बबनराव थोरात यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** राज्यात मागील अनेक वर्षांपासून शिवसेनेनी आपली पायमुळ घट्ट रोवली आहेत.हा गड काहि गद्दारानी खिळखिळा करण्यासाठी वेगळी चूल मांडली आहे. कुणी कीतीहि आटापिटा केला तरी शिवसैनिक डगमगत नाही. शिवसैनीक हेच पक्षाचे कवचकुंडले आहेत.याच बळावर पून्हा भगवा फडकावला जाईल असे प्रतिपादन शिवसेनेचे संपर्कप्रमुख बबनराव थोरात यांनी व्यक्त केले आहे.

शहरातील कीनवट रस्त्यावर असलेल्या माऊली सभागृहात मूदखेड, अर्धापूर आणि भोकर तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी व सैनिकांची बैठक घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते.व्यासपीठावर जिल्हा प्रमुख दत्ता कोकाटे, जिल्हा सहसंपर्कप्रमुख प्रकाश मारावार, मनोज भंडारे, डॉ.बी.डी.चव्हाण, माधव पावडे, महेश खेडकर,बबन बारसे, संतोष कल्याणकर, पिंटु पाटिल वासरीकर, बाळासाहेब देशमुख, विश्वंभर पवार, अविनाश झमकडे, अंकुश मामीडवार, माधव पाटील वडगावकर, पांडुरंग वर्षे वार यांची उपस्थिती होती. थोरात म्हणाले की, शिवसेनेच्या स्थापनेपासून ते आजतागायत शिवसैनिकांमुळेच पक्षाला बळ मिळाले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सैनीकातील बळा पेक्षा त्यांच्यात ऊर्मी कीर्ती आहे याचे भान ठेवून अनेक लढाया यशस्वी केल्या आहेत. आजघडीला तीच ऊर्मी पक्षप्रमुख उध्द व ठाकरे यांना देऊन येणाऱ्या काळात पुन्हा एकदा सेनेचाच मुख्यमंत्री करावयाचे आहे. आपली कार्यक्षमता सिध्द करण्यासाठी नव्याने लढा उभारण्याची गरज आहे असे सांगितले आहे. यावेळी संतोष आलेवाड, आनंद जाधव,कृष्णा कोंडलवार, अक्षय शिंदे, ज्ञानेश्वर पाटील, गजानन पवार, मनोहर साखरे, गंगाधर महादवाड, नंदू पाटील, श्याम वाघमारे, परमेश्वर जी.राव याची उपस्थिती होती. प्रास्ताविक पिंटु पाटील वासरीकर यांनी केले. बैठकीस पंचक्रोशीतील बहूसंख्य शिव सैनिकांची उपस्थिती होती.

# अब्दुल सत्तारांनंतर कदमांचीही जीभ घसरली


आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिंदे गटाचे आमदार आणि राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी सोमवारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर अर्वाच्च भाषेत टीका केली. सत्तारांच्या या विधानानंतर राज्यभरातून त्यांच्या वक्तव्याचा निषेध केला जात आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आक्रमक झाला असून त्यांनी सत्तारांची हकालपट्टी करण्याची मागणी केली आहे. हे प्रकरण ताजं असताना आता माजी मंत्री आणि शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी गलिच्छ भाषा वापरली आहे. शिवसेनेच्या नेत्यांवर टीका करताना त्यांची जीभ घसरली आहे. शिवसेना नेते अनिल परब, सुभाष देसाई आणि विनायक राऊत यांच्यावर टीका करताना रामदास कदमांनी गलिच्छ भाषा वापरली आहे. शिवसेनेच्या नेत्यांचा एकेरी उल्लेख करत रामदास कदम म्हणाले की, अनिल परब यांना लवकरात लवकर तुरुंगात टाकायला पाहिजे. त्यांना आत टाकण्यात एवढा उशीर का होत आहे? हेच मला कळत नाही. माझ्या मुलावर सगळ्यात जास्त अन्याय अनिल परबांनी केलाय. दापोली आणि मंडणगडची नगरपरिषद शिवसेनेच्या ताब्यात होती. पण अनिल परबांनी माझा मुलगा योगेश कदम यांना बाजुला ठेऊन, या नगरपरिषदा राष्ट्रवादी काँग्रेसच्या घशात घालण्याचे काम केले. अनिल परबांनी शिवसेना संपवण्याची सुपारीच घेतलीय. उद्धव ठाकरेंना अशीच माणसे आजुबाजूला लागतात असे म्हणत रामदास कदमांनी शिवराळ भाषेचा वापर केला आहे. यावेळी त्यांनी अनिल परब यांच्यासह सुभाष देसाई आणि विनायक राऊतांचाही अर्वाच्च भाषेत उल्लेख केला. सुभाष देसाई हा कान चावणारा आणि कानात बोलणारा माणूस आहे. जोपर्यंत हे नेते उद्धव ठाकरेंच्या आजुबाजूला आहेत, तोपर्यंत त्या पक्षाचे काहीही खरे नाही, असेही रामदास कदम म्हणाले.

# गंगाप्रसाद खरात राष्ट्रीय योग वीर पुरस्काराने होणार सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अखिल भारतीय योग शिक्षक महासंघ देशातील सर्व



राज्यात योगशिक्षण आणि योगशिक्षक यांच्या समस्या सोडविण्यासाठी कार्यरत असून महासंघाच्या वतीने येत्या नऊ नोव्हेंबर रोजी दिल्ली येथे राष्ट्रीय योग वीर सन्मान समारंभाचे आयोजन करण्यात आले असून महासंघाचे संस्थापक अध्यक्ष योग गुरु मंगेश त्रिवेदी जी आणि सहकारी कार्यक्रम यशस्वीतेसाठी जोरात तयारी करीत आहेत.

सदरील पुरस्कार हे केंद्रीय गृह राज्यमंत्री अजय मिश्र टेनी जी, माजी आयुष मंत्री तथा केंद्रीय जलमार्ग व परिवहन राज्यमंत्री श्रीपाद नाईक, केंद्रीय आयुष राज्यमंत्री डॉ मुंजापरा महेंद्र भाई, मोरारजी देसाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ योगाचे संचालक डॉक्टर ईश्वर बसवा रेड्डी तसेच केंद्रीय शहर विकास मंत्री कौशल किशोरजी यांच्या उपस्थितीमध्ये व शुभ हस्ते देण्यात येणार आहे. योग गुरु गंगाप्रसाद खरात यांनी कोरोनाच्या कालावधीमध्ये विविध शिबिरे, कार्यशाळा यांच्या माध्यमातून रुग्णांचे मनोबल वाढवण्यासाठी ऑनलाइन व्याख्यानासोबतच प्रतिकारशक्ती आणि फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी योगासन, प्राणायाम आणि योगनिद्रा व ध्यान यासारखे अनेक वर्ग घेतले आहेत. गंगाप्रसाद खरात हे एमजीएम विद्यापीठात योग विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असून तज्ञ मार्गदर्शक म्हणून विविध शाळा, महाविद्यालय, प्रशासकीय कार्यालयामध्ये योग प्रसार आणि प्रचाराचे अविरत असे काम करीत आहे. या क्षेत्रातील कामाची दखल घेऊन अखिल भारतीय योगशिक्षक महासंघा तर्फे योग गुरु गंगाप्रसाद खरात यांना राष्ट्रीय योग वीर पुरस्काराने दिल्ली येथील विशेष कार्यक्रमात सन्मानित करण्यात येणार आहे.

या विशेष पुरस्काराबद्दल त्यांचे योग आणि क्रीडा क्षेत्रातील व्यक्ती, विद्यार्थी आणि मित्रमंडळी यांनी अभिनंदन केले आहे.

# म्युझिक सर्कलच्या गायन स्पर्धेमध्ये रंगारंग गीतांची समधुर उधळण

## कलाकार घडविण्यासाठी स्पर्धांचे आयोजन गरजेचे : चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज




**औरंगाबाद :** मराठवाडा म्युझिक सर्कल रिसर्च फाउंडेशन औरंगाबाद व झकास म्युझिक प्रस्तुत , स्टुडिओ मॅजिक मुंबईच्या सहकार्याने औरंगाबाद येथे हॉटेल वर्षा इन येथे कराओके गायन स्पर्धेचे भव्य असे आयोजन करण्यात आले होते सुरताल संगीताच्या धुंद अशा या स्पर्धेचे आयोजन करण्यामागची भूमिका प्रा.जगदीश वेदपाठक यांनी स्पष्ट करताना सांगितले की संगीताचा प्रसार व प्रचार व्हावा याबरोबरच सर्वसामान्य गायक गायिकांना आपल्यामध्ये असलेला सुप्त कलागुणांना मंचावर प्रदर्शित करण्यात यावे याकरिता झकास म्युझिक व सर्व टीमने अशा कार्यक्रमाचे आयोजन नेहमीच केलेले आहे. या स्पर्धेमध्ये लहानापासून मोठ्यांपर्यंत महिला व पुरुष गायिकांनी सहभाग नोंदवला.महिला गटात प्रथम येण्याचा मान पुनम होलिये यांनी पटकावला तर पुरुष गटात अरविंद जाधव यांनी प्रथम क्रमांक पटकावला तर लहान गटात सम्यक शिंदे या बालकलाकाराने बाजी मारली या स्पर्धेचे उद्घाटन श्री केदार पालोदकर रेडीको एन व्ही डिस्टलरीज चे एचआर मॅनेजर यांच्या हस्ते व प्रमुख अतिथी महिला उद्योजिका सौ .लक्ष्मीबाई महाकाळ - चेअरमन ,श्री बालाजी इंडस्ट्रीज शेंद्रा एमआयडीसी औरंगाबाद व उद्योजक प्रदीप जी चव्हाण संचालक हॉटेल अशोका ग्रुप व नर्मदा प्युअर व्हेज अँड रेस्टॉरंट , याबरोबरच प्राचार्य डॉक्टर देशमुख हे उपस्थित होते याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उच्च न्यायालयाचे ज्येष्ठविधीतज्ञ जनार्दन जाधव याबरोबरच एस एस पाटील ज्येष्ठ पत्रकार संजय हिंगोलीकर ज्येष्ठ गायक सोनाजीपंत बिरारी गायक संगीतकार प्राध्यापक धीरज भालेराव, सुप्रसिद्ध गायिका स्नेहल कीर्तने, प्रसिद्ध गिटार वादक ,संगीतकार व त्रिनिटी युनिव्हर्सिटी ऑफ म्युझिक चे सदस्य अरविंद बाविस्कर आदी मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती प्रमुख अतिथींच्या हस्ते प्रथम द्वितीय तृतीय पारितोषिक देण्यात आली तर सर्व सहभागींना प्रमाणपत्र देण्यात आले जनाधिकार सोसायटी महाराष्ट्राचे विनोद जयस्वाल सामाजिक कार्यकर्ते फंटे , काथार रेडीको कंपनीचे जोशी, ज्येष्ठ पत्रकार संजय हिंगोलीकर सामाजिक कार्यकर्ते गणेश पवार यांची उपस्थिती होती. आभार राहुल जयस्वाल यांनी व्यक्त केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी श्रद्धा औरंगाबादकरने अतिशय सुरेख केले.

# स्वागताध्यक्षपदी माजी खा. दत्ता मेघे, संरक्षक म्हणून माजी आ. सागर मेघे

## विदर्भ साहित्य संघ आयोजित ९६ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**माधुरी पांडे**

**नागपूर :** विदर्भ साहित्य संघातर्फे



आयोजित होत असलेल्या अ. भा. मराठी साहित्य महामंडळाच्या ९६ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी माजी खासदार दत्ता मेघे यांची निवड करण्यात आली असून या संमेलनाच्या संरक्षकपदाची जबाबदारी माजी आ. सागर मेघे यांनी स्वीकारली आहे. हे साहित्य संमेलन दिनांक ३,४ आणि ५ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत वर्धा येथील स्वावलंबी शाळेच्या भव्य पटांगणावर आयोजित होणार आहे. या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्षपद स्वीकारणारे दत्ता मेघे यांचा जन्म वर्धा जिल्ह्यातील पवनार येथील असल्यामुळे या साहित्य संमेलनाच्या आयोजनात औचित्य साधले गेले आहे, असेही म्हणता येईल. दत्ताजी मेघे हे महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणात सुमारे चाळीस वर्षांपासून कार्यरत असून त्यांनी आपल्या राजकारणाचा प्रारंभ महाराष्ट्रातल्या पुलोद सरकारपासून केला आहे. तीन वेळा आमदार आणि चार वेळा खासदार म्हणून राजकीय क्षेत्रात वावरताना त्यांनी शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक



क्षेत्रातही महत्त्वाचे कार्य केले आहे. नागपूर येथे नगर युवक शिक्षण मंडळाची स्थापना करून त्यांनी अभियांत्रिकी आणि उच्च शिक्षणाची पायाभरणी केली. त्याअंतर्गत स्कूल्स ऑफ स्कॉलर्सचे जाळे सर्वत्र उभे करून नागपूरच्याच नव्हे तर विदर्भाच्या शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणली. त्याशिवाय, दत्ता मेघे मेडिकल सायन्सेस या संस्थेतर्फे सावंगी मेघे येथे भव्य वैद्यकीय महाविद्यालयाची उभारणी केली. आज महाराष्ट्रात शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रात क्रांती घडवून आणणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणून श्री. दत्ताजी मेघे अग्रगण्य समजले जातात. त्यांच्याच पावलांवर पाऊल टाकून त्यांचे सुपुत्र श्री. सागर मेघे हेही सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वाचे कार्यरत आहेत. नागपूर येथे २००७ साली विदर्भ साहित्य संघातर्फे संपन्न झालेल्या ८० व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या संरक्षकपदाची जबाबदारी दत्ताजी मेघे यांनीच स्वीकारली होती. अ.भा. मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदाची आणि संरक्षपदाची जबाबदारी पिता-पुत्राने एकाचवेळी सांभाळणे, ही अ.भा. मराठी साहित्य संमेलनाच्या इतिहासातली एक महत्त्वाची आणि अपूर्व घटना ठरावी. या साहित्य संमेलनाच्या मार्गदर्शक पदाची जबाबदारी केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांनी स्वीकारली असून विदर्भ साहित्य संघाच्या पदाधिकाऱ्यांसह वर्धा येथील साहित्यप्रेमी, कार्यकर्ते या साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी प्रयत्नशील आहेत. स्वागताध्यक्ष दत्ता मेघे यांचे त्यांच्या निवासस्थानी जाऊन विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, कार्याध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, सरचिटणीस विलास मानेकर आणि कोषाध्यक्ष विकास लिमये यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

# कृष्णकुमार पांडेंच्या निधनाने काँग्रेसचा कट्टर कार्यकर्ता हरपला : जयराम रमेश

## भारत जोडो यात्रेत सेवादलाच्या कृष्णकुमार पांडेंचे हृदयविकाराने निधन

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** भारत जोडो यात्रेच्या ६२ व्या दिवशी सकाळी एक दुःखद घटना घडली. सेवादलाचे राष्ट्रीय सरचिटणीस तसेच मध्यप्रदेश काँग्रेस सेवा दलाचे प्रभारी कृष्णकुमार पांडे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. पांडे यांच्या निधनाने काँग्रेसचा एक कट्टर कार्यकर्ता हरपला, अशा शब्दात अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया विभागाचे प्रमुख जयराम रमेश यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. पांडे यांच्या निधनाची माहिती पत्रकारांना देताना जयराम रमेश म्हणाले की, कृष्णकुमार पांडे हे सकाळी भारत जोडो यात्रा सुरु होताच तिरंगा हातात घेऊन मी व दिग्विजयसिंह यांच्यासोबत चालत होते, काही वेळानंतर त्यांनी तिरंगा झेंडा दुसऱ्या कार्यकर्त्याकडे देऊन मागून चालत असताना अचानक खाली कोसळले, त्यांना तातडीने हॉस्पिटलला पाठवण्यात आले पण त्यांचे निधन झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. कृष्णकुमार पांडे हे काँग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते होते आणि जीवनाच्या अखेरच्या श्वासापर्यंत ते



काँग्रेसचे पाईक राहिले. काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये ते के. के. पांडे नावाने प्रसिद्ध होते, त्यांनी महाराष्ट्र सेवादलाचे अध्यक्षपदही भूषवले आहे. भारत जोडोच्या कॅम्पमध्ये खा. राहुल गांधी यांच्यासह भारतयात्री व शेकडो काँग्रेस कार्यकर्त्यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. खा. राहुल गांधी यांनी कृष्णकुमार पांडे यांच्या मुलांची भेट घेऊन सांत्वन केले. "कृष्णकुमार पांडे यांचे निधन संपूर्ण काँग्रेस परिवारासाठी अत्यंत दुःखद आहे. त्यांच्या कुटुंबाप्रती मी सहवेदना प्रकट करतो. जीवनाच्या शेवटच्या क्षणी त्यांच्या हातात तिरंगा होता. देशासाठी त्यांचे समर्पण सदैव प्रेरणा देत राहिल", अशा शब्दात राहुल गांधी यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या आहेत. पांडे यांच्या आत्म्यास शांती लाभो आणि त्यांच्या शोकाकुल परिवाराला हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, असे जयराम रमेश म्हणाले. पांडे यांच्या निधनामुळे आजची पदयात्रा कोणताही गाजावाजा न करता, शांततेने पुढे निघाली तसेच संध्याकाळी भोपाळा गावात शोकसभा घेण्यात आली.

# जितेंद्र आव्हाड यांच्यासह १०० कार्यकर्त्यांवर गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** माजी खासदार संभाजी छत्रपती यांनी 'हर हर महादेव' आणि 'वेडात मराठे वीर दौडला सात' या मराठी चित्रपटांना विरोध केल्यानंतर राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड हेदेखील आक्रमक झाले आहेत. या चित्रपटांत छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयीच्या इतिहासाची मोडतोड करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. याच कारणामुळे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी ठाणे जिल्ह्यातील एका मॉलमधील हर हर महादेव या चित्रपटाचा शो बंद पाडला. परिणामी जितेंद्र आव्हाड यांच्यासह राष्ट्रवादीच्या १०० कार्यकर्त्यांविरोधात ठाण्यातील वर्तक नगर पोलीस ठाण्यात वेगवेगळ्या कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हर हर महादेव या चित्रपटाला विरोध म्हणून जितेंद्र आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीच्या काही कार्यकर्त्यांनी सोमवारी रात्री ११ वाजता ठाण्यात आंदोलन केले. यावेळी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी प्रेक्षकांना सिनेमागृहातून बाहेर जाण्याचे आवाहन केले. त्यानंतरही सिनेमागृहात बसून असलेल्या प्रेक्षकांना राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी हुसकावून लावल्याने किरकोळ वादाचे प्रसंगही घडले. याच कारणामुळे आता ठाण्याच्या वर्तकनगर पोलीस ठाण्यात भारतीय दंडविधानाच्या १४१, १४३, १४६, १४९, ३२३, ५०४, अशा वेगवेगळ्या कलमांतर्गत आव्हाड यांच्यासह त्यांच्या १०० कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वर्तकनगर पोलीस ठाण्यात या गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. "शिवाजी महाराजांच्या मांडीवरती झोपून आहे अफजलखान आणि त्याचा कोथळा फाडला आहे. हे इतिहासात कुठेच नाहीय," असे आव्हाड म्हणाले. त्याचप्रमाणे 'हर हर महादेव' चित्रपटामध्ये बाजीप्रभू देशपांडे आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या लढाईचं दृष्य दाखवण्यात आले असून त्यालाही आव्हाड यांनी विरोध केला आहे.

# फागणे येथे नक्षत्र प्रतिष्ठान तर्फे "आई तुला त्रिवार वंदन" पुरस्कार वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**फागणे :** ज्या महिलांनी संसारात एकटीने एकाकी लढत देऊन पदरात असलेल्या अजाण लेकरांना मोठे केले, त्या महिलांच्या संघर्षाला मानाचा मुजरा या कार्यक्रमाच्या माध्यमातून समाज सेविका, नक्षत्र प्रतिष्ठान च्या अध्यक्षा रत्नाताई पाटील यांनी करण्याचा प्रयत्न केला आहे. कठीण काळातून चटके सोसत पावलोपावली अग्निपरीक्षा देत तावून सुलाखून निघालेल्या या रणरागिणींचा हा कौतुकास्पद कामगिरीचा सोहळा होता. या प्रसंगी सर्व पुरस्कारार्थी महिलांना भावना अनावर झाल्या... सर्वांचे अश्रू भुतकाळाचा इतिहास घेऊन वाहत राहिले, संसाररथाची स्त्री पुरुष ही दोन चाके. पण दुसरं चाक निखळून पडले तरी या जिद्दी माय



माऊल्यांनी लेकरांच्या भविष्यासाठी कंबर कसली. डोळ्यातील दुःख, वेदना, अपमान, अवहेलना.. सारं विष पचवून समाजाच्या रणांगणात अविरत लढत राहिल्या... त्या माऊलींच्या पुढे विनम्र अभिवादनाचा हा सोहळा साजरा केला. या कार्यक्रमात सुरेखा पाटील, वंदना बडगुजर, शोभा चौधरी, मंगला गजरे, प्रतिभा पवार, वंदना पाटील, कविता बडगुजर, अनिता पाटील, जयश्री पाटील, संगिता पाटील या माता - भगिनींना आई तुला त्रिवार वंदन...पुरस्कार 2022 ने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फागणे ग्रामपंचायतीचे प्रथम लोकनियुक्त सरपंच मा. विलास अण्णा चौधरी हे होते. कार्यक्रमाचे उद्घाटक व मार्गदर्शक फागणे गावाचे प्रथम नागरिक व विद्यमान सरपंच कैलास भाऊ पाटील होते. प्रमुख अतिथी म्हणून सौ. मंगलाताई पाटील, भास्कर पाटील, सुनील सुर्यवंशी, युवराज पाटील, प्रकाश बडगुजर, भाविता देवरे, मीनल अग्रवाल, प्रभाकर शेळके, अमित बडगुजर आदी मान्यवर उपस्थित होते, तसेच नक्षत्र प्रतिष्ठानचे पदाधिकारी स्वप्नील पाटील, प्रियंका पाटील, कुणाल पाटील, वैशाली पाटील, निशा अहिरे यांची उपस्थिती होती. नक्षत्रच्या सर्व संचालकांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परीश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी प्रा. प्रभाकर शेळके यांनी केले.

# कवयित्री शशिकला गुंजाळ यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्राच्या आधुनिक बहिणाबाई म्हणून




ओळखल्या जाणाऱ्या कवयित्री सौ. शशिकला आक्का गुंजाळ यांना २०२२ चा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार नुकताच जाहीर झाला. त्याचे वितरण दिल्ली येथील महाराष्ट्र सदनमध्ये डॉ. भागवतजी कराड (केंद्रीय अर्थराज्यमंत्री, भारत सरकार), ना. रामदासजी आठवले (केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री, भारत सरकार), बी. आर. इधाते (सदस्य नीती आयोग, भारत सरकार) यांच्या प्रमुख उपस्थितीत केले जाणार आहे. तसेच या कार्यक्रमाच्या मुख्य आयोजक नवनीत रवि राणा (खासदार अमरावती लोकसभा क्षेत्र) या असून कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडणार आहेत. कवयित्री शशिकला आक्का गुंजाळ उस्मानाबाद जिल्ह्यातील वांगी या छोट्याशा खेड्यागावातील असून त्यांचा व्यवसाय शेती आहे. तसेच त्यांचे शिक्षण सातवीपर्यंत असून त्या साध्या स्वभावाच्या आहेत. मराठी साहित्यात त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांचे अमृतवाणी व शब्द-श्रावण हे काव्यसंग्रह प्रकाशित असून जात्यावरील ओव्या प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. त्यांना आतापर्यंत विविध संस्थाचे ५० पेक्षा जास्त पुरस्कार मिळालेले असून ५५० च्या वर सन्मानपत्र प्राप्त झालेले आहे. तसेच त्या न्याय देणारा परिवाराच्या सदस्या देखील आहेत. त्यांच्या निवडीबद्दल त्यांना न्याय देणारा परिवाराच्या प्रमुख जयश्री औताडे, सहप्रमुख पूनम बेडसे, उपप्रमुख कावेरी गायके, उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर, मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाच्या जॉईन्ट सेक्रेटरी ॲड, शुभांगी मोरे, मनीषा महेर, विजेता चन्नेकर, प्रियंका बागड-अमृतकर, मीना शिंदे, सुनिता कपाळे, अनिता सोनवणे, पल्लवी पवार, संगिता ठलाल, जयश्री जगताप, श्वेता चौधरी, स्नेहल जगताप, अनुराधा मोतेवार, तृप्ती थोरात, डॉ. रोहिणी धात्रक, डॉ. वैष्णवी मनगटे, कविता महाडिक, शिल्पा सिन्हा, सुरेखा तांबे, सारिका टेकाळे योगेश काळे, दत्तू ठोंबरे, दत्तू हिरे, प्रा. पठारे, राहुल सोळस, सचिन मोरे, विशाल इंगोले, शशांक पाटील यांच्यासह साहित्य क्षेत्रातील अनेकांनी शुभेच्छा दिल्या.



कवयित्री शशिकला आक्का गुंजाळ या आधुनिक बहिणाबाई म्हणून महाराष्ट्रभर परिचित आहे. तसेच त्या न्याय देणारा परिवाराच्या सदस्या देखील आहेत. त्या कमी शिकलेल्या असल्या तरी त्यांचा कवितावर मनापासून जीव आहे. दिवसभर शेतात काम करून घरी आल्यानंतर मिळालेल्या वेळात त्या लेखन करतात. त्यांचे लेखन हे उच्चशिक्षित लेखकालाही लाजवेल असेच आहे. त्यांच्या कवितेत, शेतीमाती, ग्रामीण स्त्री, ग्रामीण शिक्षण असे विविध विषय असतात. त्यांना जाहीर झालेला २०२२ चा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार हा नक्कीच ग्रामीण भागाची, ग्रामीण स्त्रीची मान उंचवणारा आहे.

**बाबा चन्ने, (ग्रामीण साहित्यिक), धोंदलगाव, ता. वैजापूर**

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# पैठण शहरात मंत्री सत्तार विरोधात जोरदार घोषणाबाजी

## मंत्री सत्तार व गुलाबराव पाटील यांच्यावर कारवाई करण्याची राष्ट्रवादीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी खासदार सुप्रिया सुळे यांच्या बद्दल केलेल्या बेताल वक्ताव्याच्या विरोधात पैठण शहर व तालुका राष्ट्रवादी काँग्रेस च्या वतीने पैठण बसस्थानक चौकात जोरदार घोषणाबाजी करत मंत्री अब्दुल सत्तार यांचा जाहीर निषेध करण्यात आला. या अंदोलनाचे नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष आप्पासाहेब निर्मळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दत्ता गोर्डे, माजी आमदार संजय वाघचौरे, शहराध्यक्ष जितु परदेशी, यांनी केले. माता भगिनी चा आदर करणे ही आपल्या महाराष्ट्राची संस्कृती आहे. असे असताना राज्याचे जवाबदार सरकार मधील मंत्री महीलांच्या विरोधात बेताल व्यक्तव्य करतात. ही अशोभनीय बाब आहे. या घटनेचा आम्ही निषेध करत असुन मंत्री सत्तार व मंत्री गुलाबराव पाटील यांच्या विरोधात कारवाई करावी अशी मागणी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दत्ताभाऊ गोर्डे यांनी केली. यावेळी आनिल घोडके, नगरसेवक कल्याण भुकेले, इरफान बागवान, बजरंग लिबोंरे, ज्ञानेश घोडके, आकाश रावस, उमेश पंडुरे, आप्पासाहेब गायकवाड, भाऊसाहेब पिसे,गौतम बनकर, सचिन जोतिक, प्रितम आडसुळ, संजय कोर्डे, अजु कटयारे, अफरोज वड्डे, भास्कर दाभाडे, विनोद सरवदे, निता कायस्थ, तस्लिम पठाण, शांताबाई नरवडे, यांच्या सह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. शेवटी पोलीस निरीक्षक किशोर पवार यांना निवेदन देण्यात आले.





# मेडिगट्टा महाबंधारा प्रकल्प पीडित शेतकऱ्यांचे आजपासून उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** जिल्ह्यातील मेडिगट्टा या आंतरराज्य महाबंधाऱ्याच्या कामामुळे ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी यात पाण्याखाली गेल्या त्यांना अद्यापही कुठल्याही प्रकारचा मोबदला देण्यात आला नाही. मेडिगट्टा धरणाचे बॅकवॉटर या शेतजमिनीत सातत्याने राहत असल्याने शेतजमिनी कसण्यायोग्य राहिलेल्या नाहीत. अशा परिस्थितीत इथल्या शेतकऱ्यांनी आंदोलनाची मालिका सुरु केली आहे. शासनाच्या उदासिनतेच्या विरोधात मेडिगट्टा महाबंधारा पीडित शेतकऱ्यांनी सिरोंचा तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. तसेच शेतकऱ्यांनी बेमुदत साखळी उपोषण आणि धरणे आंदोलन सुरु केले आहे.

परिसरात भात शेती करण्यात येते. मात्र सातत्याने दुष्काळाचा सामना करत असलेल्या तेलंगणा राज्यातील बहुतांश भाग गोदावरी नदीवर बांध घालून सुजलाम सुफलाम करण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील गडचिरोली जिल्ह्यातल्या टोकावरच्या सिरोंचा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी मात्र पाण्याखाली गेल्या आहेत. गेली दहा वर्षे मेडिगट्टा या आंतरराज्य महाबंधाऱ्याचे काम सुरु झाल्यापासून शेतकरी योग्य मोबदला आणि पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र महाराष्ट्र सरकार तसेच तेलंगणा सरकार या दोन्ही सरकारकडून शेतकऱ्यांच्या पदरात आश्वासनाचे गाजर टाकरे परंतु त्यांची निराशाच झाली. मागील देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात हा प्रकल्प मंजूर होऊन पूर्णत्वास गेला. तरी शेतकरी अद्यापही मदतीच्या अपेक्षेत आहेत. महाराष्ट्र आणि तेलंगणा सरकारने स्थानिक शेतकऱ्यांची सातत्याने फसवणूक केल्याची भावना यावेळी शेतकऱ्यांनी बोलून दाखवली आहे. महाराष्ट्रातील ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या प्रकल्पात यात पाण्याखाली गेल्या त्यांना अद्यापही कुठल्याही प्रकारचा मोबदला देण्यात आला नाही. मेडिगट्टा धरणाचे बॅकवॉटर या शेतजमिनीत सातत्याने राहत असल्याने शेतजमिनी कसण्यायोग्य राहिलेल्या नाहीत. अशा परिस्थितीत इथल्या शेतकऱ्यांनी आंदोलनाची मालिका सुरु केली आहे. मात्र राज्य सरकारने केवळ कागदी घोडे नाचवले असून स्थानिक शेतकऱ्यांनी संतापून आता सिरोंचा तहसील कार्यालयसमोर धरणे आणि साखळी उपोषण आंदोलन सुरु केले आहे. तेलंगणा आणि महाराष्ट्र सरकारने एकत्र येत जमिनीचा योग्य मोबदला देऊन शेती शेतकरी पुनर्वसन याबाबत तोडगा काढावा अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# छाया खाजेकर यांना अधिसभा सदस्यपदाची उमेदवारी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातील



अधिसभा सदस्य पदाची निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली असून अखिल भारतीय विद्यार्थी परिषद पुरस्कृत विद्यार्थी विकास मंचाच्या अधिकृत अधिसभा निवडणुकीची उमेदवारी सामाजिक कार्यकर्त्या तथा भाजपा महिला मोर्चाच्या शहर-जिल्हा उपाध्यक्षा सौ. छाया राजु खाजेकर यांना जाहीर झाली आहे. लवकरच ही अधिसभा निवडणूक होणार असून यांत कोण बाजी मारेल हे चित्र मात्र निवडणूक झाल्यानंतरच बघावयास मिळेल मात्र एक अभ्यासु, विकासाभिमुख आणि विद्यार्थी विकास मंचाचा सर्वांगीण विकास करण्याची भक्कम क्षमता असलेल्या छाया खाजेकर यांचे पारडे वजनदार असण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. त्यांची उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल त्यांचे राजकीय, सामाजिक आणि इतर सर्वच क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे.

# अब्दुल सत्तारांविरोधात राष्ट्रवादीचे आंदोलन



आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या संसदरत्न खा.सुप्रियाताई सुळे यांच्या विषयी असभ्य भाषेत टिप्पणी करणारे राज्याचे कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांच्या निषेधार्थ आज गंगापूर तालुका राष्ट्रवादी काँगेस पक्षाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे तीव्र निदर्शने करून बेताल वक्तव्य करणाऱ्या सत्तार यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून त्यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. यावेळी जिल्हा अध्यक्ष तथा मा.आ. कैलास पाटील, मारोतराव साळवे, वाल्मिक शिरसाठ यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# बॉम्बशोधक पथकावर अर्थसंकट; जोखीम भत्त्यात कपात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** बॉम्बस्फोट तसेच बॉम्ब किंवा सदृश्य वस्तू सापडण्याच्या वाढत्या घटनांमुळे बॉम्ब शोधक व नाशक पथकासमोर आव्हान निर्माण झालेले असताना या पथकातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या जोखीम भत्त्यात राज्य सरकारने निम्म्याने कपात केली आहे. वेतनाच्या पन्नास टक्के जोखीम भत्त्याऐवजी पंचवीस टक्के भत्ता देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला



आहे. सातव्या वेतन आयोगानुसार पूर्वलक्ष्यी प्रभावाने सहा वर्षांतील २५ टक्के रक्कम वसूल केली जाणार असल्याने कर्मचारी धास्तावले आहेत. या पथकाला बॉम्ब किंवा सदृश्य वस्तू हाताळणे, ती निकामी करणे, अतिमहत्त्वाच्या आणि परदेशी व्यक्तींची सुरक्षा, सण व उत्सव; तसेच राजकीय सभेच्या पार्श्वभूमीवर तपासणी अशी विविध कर्तव्ये पार पाडावी लागतात. या जोखमीच्या कामासाठी सरकारने सुरुवातीपासून वेतनाच्या पन्नास टक्के जोखीम भत्ता सुरू केला होता. वाहनचालकांना तीस टक्के भत्ता देण्यात येत होता. त्यामध्ये आता बदल करण्यात आला आहे.

# दोन एसटी बसची समोरासमोर धडक

आधुनिक केसरी न्यूज

**जव्हार :** शहराला लागून असलेला डबकपाडा येथे सिल्वासाहून नाशिकला येणाऱ्या आणि जळगावहून सिल्वासाला जाणाऱ्या दोन एसटी बसची वळणावर सामोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. सोमवारी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास डबकपाडा (झिरपटी) जवळील प्रकाश पोल्ट्रीलगत झालेल्या या अपघातात २४ प्रवासी जखमी झाले. यापैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे. एसटी बसच्या चालकांच्या हलगर्जीमुळे अलिकडे एसटी बसचे वारंवार अपघात होत आहेत. सोमवारी सकाळी झालेल्या अपघातात दोन्ही बसगाड्यांचे मोठे नुकसान झाले. लांब पल्ल्याच्या बस असल्यामुळे बसमध्ये प्रवासी जास्त होते. जखमी झालेल्यांपैकी दोन प्रवाशांची प्रकृती गंभीर असून, त्यांना जव्हारच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# सावळदबारा येथे काकडा आरती परिक्रमेमध्ये बालगोपालांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे मंगळवार ता. ८/११/२२ मंगळवार रोजी कार्तिकी पौर्णिमानिमित्त नागोबा यात्रा सकाळी सातला हरि हारेश्वर विठ्ठल मंदीरा पासून काकडा आरतीच्या सांप्रदायिक दिंडीला सुरुवात झाली होती. सांप्रदायिक वारकरी भंजनी मंडळाच्या वतीने काकडा आरती गाव परिक्रमनामधे बालगोपालंसह युवक, वृद्ध, महिला मंडळ मंडळींची मांदियाळी सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील विठ्ठल रुखमिणी मंदीरापासून सांप्रदायिक वारकरी भजनी मंडळाच्या वतीने कार्तिंक मासमध्ये गावामधून परिक्रमन करीत प्रातःकाळी काकडा आरती काढण्यात येते. या निघणाऱ्या काकडा आरती मध्ये मोठी मांदियाळी असते.हे सांप्रदायिक वारकरी दिंडी भजनी मंडळ गेले एक महिन्यापासून रोज सकाळी सकाळी पाच वाजता निघत होती या काकडा आरतीचा आज समारोप करण्यात आला आहे. हि काकडा आरती सकाळी हरि-हारेश्वर विठ्ठल रुखमणी मंदीरापासून सुरुवात करण्यात आली होती. चौका चौकात सांप्रदायिक वारकरी मंडळाच्या वतीने प्रसाद वाटप करण्यात आला.व गावातील महिलांनी आप आपल्या दारी चांगल्या प्रकारे छान अशा रांगोळ्या काढून काकडा आरती ओवाळून काढत होत्या. श्री.गजानन महाराज, संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या प्रतिमा खुर्च्यावर ठेवून



प्रतिमेचे पूजन करून काकडा आरतीतील भक्तांना गंधटिळा लावून त्यांचे स्वागत करण्यात आले.या कार्तिंक मासामध्ये हरिनामाचा गजरासह संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ओव्यांचा गजर होत असल्याने गावातील वातावरण भक्तीमय होत आहे. हि काकडा आरती गावभर फिरून आल्यावर विठ्ठल रुखमणी मंदीरावर मोठ्या उत्साहात प्रसाद वाटप करून कार्यक्रमाचीक्षसांगता करण्यात आली. अशी माहिती ह.भ.पा. आबाराव कोलते, ह.भ.पा. वासुदेव खडके,यांनी बोलताना सांगितले. या सांप्रदायिक वारकरी भक्त जन ह.भ.पा किशोर महाराज गावडे,ह.भ.प.पंधरी गाढवे,सोपान मानकर, आकाश कळशकर, ह.भ.पा.विशाल महाराज खडके, ह. भ. पा. शंकर महाराज साबळे, ह.भ.पा. बेलाआप्पा करदळे, ह.भ.पा.हरी भांबरे, दिलीप टिकारे, सुनील चव्हाण, शंकर राजपूत,अशी माहिती प्रा. जीवन कोलते (सामाजिक कार्यकर्ते) सावळदबारा यांनी दिली.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते संस्कार खटावकरचा गौरव

## पाच मिनिटे ५१ सेकंदात शिवतांडव व महिषासुरमर्दिनी स्तोत्र पठणाचा विश्वविक्रम




आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** अवघ्या पाच मिनिटे आणि ५१ सेकंदात शिवतांडव व महिषासुरमर्दिनी स्तोत्र पठणाचा विश्वविक्रम करणाऱ्या पुण्यातील संस्कार ऋषिकेश खटावकर याचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गौरव केला. मंत्रालयात झालेल्या भेटीवेळी मुख्यमंत्र्यांनी संस्कारचा सत्कार करत त्याच्या विक्रमाचे कौतुक केले. प्रसंगी आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्यासह संस्कारचे वडील ऋषिकेश खटावकर आदी उपस्थित होते.शिवाजीनगर येथील मॉडर्न प्री-प्रायमरी स्कूल मध्ये तिसरीत शिकणाऱ्या संस्कारने नुकतीच ही विक्रमी कामगिरी केली. त्याच्या या विक्रमाची दखल इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड व वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड लंडन यामध्ये घेण्यात आली आहे. महिषासुरमर्दिनी स्तोत्रम् तीन मिनिटे सात सेकंदात पठण करीत त्याने केरळच्या मुलीचा तीन मिनिटे ४४ सेकंदाचा विक्रम मोडला. ऋषिकेश खटावकर म्हणाले, "महिषासुरमर्दिनी स्तोत्रम् आणि शिवतांडव स्तोत्र बोलण्यास कठीण आहेत. मात्र, आम्ही गेली तीन वर्षे तयारी करत होतो. कोरोना काळात शाळा बंद असल्यामुळे आम्हाला अधिक वेळ मिळाला. त्याची आई मोनिका ऋषिकेश खटावकर यांनीही त्याचे चांगले पाठांतर करून घेतले.

# कन्नड शहरातील बहिणींनी मनोज पवार यांना ओवाळून दिले आशीर्वाद



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरात प्रथमच उद्योजक मनोज पवार यांनी आपली संस्कृती जपत बहिण व भाऊ यांच्यातील अनमोल नात्यांचा आदर्श ठेवत कन्नड शहरातील सर्व परिसरातील आपल्या बहिणींना भाऊबीज निमित्त त्यांच्या घरी भेट देऊन बहीणींची आपुलकीने विचारपुस शहरातील महीला भगिनेनेही औक्षण करून भाऊबीजनिमित्त मिठाई भरवून शुभेच्छा दिल्या मनोज पवार यांनी ही भगीनिना भेट वस्तु देऊन सन्मान केला तसेच शहरातील प्रभाग क्र.१ म्हाडा कॅालनी, इंदिरानगर, पांडवनगरी, आदी ठिकाणाहुन उद्योजक मनोज भाऊ पवार यांनी आपल्या बहिणींच्या घरी प्रत्यक्ष भेट दिली यावेळी बहीणींनी देखील पवार यांचे औक्षण करत भरभरून आशीर्वाद दिले. अशा स्तुत्य कार्यक्रमामुळे शहरात मनोज पवार यांचे कौतुक होत आहे. यावेळी सिद्धार्थ निकाळजे, संदेश पवार, योगेश त्रिभवन, मनोज देशमुख, बंन्टी जाधव यांची उपस्थिति होती.

# महिलांबद्दल अपशब्द वापराल तर राष्ट्रवादी धडा शिकवणार : बबनराव बनसोड

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या जेष्ठ नेत्या संसदरत्न सुप्रियाताई सुळे यांच्याबद्दल अपशब्द वापरणाऱ्या अब्दुल सत्तार यांचा राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष बबनराव बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली किशोर नाका येथे जाहीर निषेध नोंदवण्यात आला. यानंतर सातारा कडून महिलांचा अपमान होणार नाही असे निवेदन पोलीस निरीक्षक राजीव तळेकर यांना देण्यात आले यावेळी तालुका अध्यक्ष बबनराव बनसोड, शहर अध्यक्ष भैय्या मेंबर, युवा अध्यक्ष कल्याण पवार, अॅ कृष्णा जाधव,अनिल गायकवाड, साईनाथ करवंदे, अविनाश काळे इत्यादी राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्ते उपस्थिती होती.



# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात संस्थांचा पुढाकार महत्त्वाचा : चंद्रकांत पाटील



आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कालानुरूप विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण, कौशल्याभिमुख आणि सर्वांगीण विकासाचे शिक्षण देण्याची गरज आहे. या कार्यात शिक्षण संस्थांनी पुढाकार घेऊन शालेय वयापासूनच रोजगारक्षम व उद्यमशील विद्यार्थी घडविण्यावर भर द्यावा," असे मत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण तथा पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले. बाणेर येथील भैरवनाथ शिक्षण संस्था संचलित आदित्य इंग्रजी माध्यम शाळेच्या २२ व्या वर्धापन दिनानिमित्त चंद्रकांत पाटील यांनी सदिच्छा भेट देत संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती घेतली. प्रसंगी भैरवनाथ शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवलाल ऊर्फ नाना धनकुडे, अध्यक्षा सुरेखा धनकुडे, सचिव विराज धनकुडे, खजिनदार राहूल धनकुडे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुषमा भोसले, माजी प्राचार्य अविनाश ताकवले, सल्लागार राजु आव्हाड व मुख्याध्यापिका रेखा काळे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेच्या वतीने चंद्रकांत पाटील यांचा छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. चंद्रकांत पाटील म्हणाले, गेल्या २२ वर्षात आदित्य इंग्रजी माध्यम शाळेने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. हजारो विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य देशासाठी महत्वपूर्ण असे आहे. धनकुडे यांनी शैक्षणिक प्रगतीसह संवेदनशील वृत्तीने सामाजिक कार्यातही भरीव योगदान दिले आहे. अनाथ व गरीब मुलामुलींना दत्तक घेऊन त्यांच्या विकासासाठी केलेले कार्य कौतुकास्पद आहे. शिवलाल उर्फ नाना धनकुडे म्हणाले, "विद्यार्थ्यांना चांगला नागरिक घडविण्याचा वसा यापुढेही आम्ही असाच घेऊन जाऊ. समाजातील वंचित घटकांना शिक्षण देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करत आहे. बावीस वर्षाच्या या प्रवासात माझे सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांचा वाटा महत्वाचा राहिला आहे.

# हौशी, व्यावसायिक रंगभूमी कलावंतांना उत्तम संधी देणार : सुधीर मुनगंटीवार

## गोवा येथे थाटात पार पडला राज्य हौशी नाट्य स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**गोवा :** राज्यातील हौशी रंगभूमी, कलावंत तसेच व्यावसायिक मंच या सर्वांना योग्य संधी उपलब्ध व्हावी; नाटयगृहे प्रशस्त व अद्ययावत व्हावीत आणि त्या माध्यमातून महाराष्ट्र सांस्कृतिक क्षेत्रात क्रमांक एकचे राज्य होईल असा विश्वास राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी येथे व्यक्त केला.

५९ व्या राज्य हौशी नाट्य स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात रविवारी ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नाट्य कलाकार विजय गोखले, सांस्कृतिक विभागाचे उपसचिव विलास थोरात, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे मंचावर उपस्थित होते.

यावेळी सुधीर मुनगंटीवार यांनी विजेत्यांचे अभिनंदन करून, नाट्य क्षेत्रासाठी काही महत्वपूर्ण घोषणा केल्या. महाराष्ट्राबाहेरील नाट्यसंस्था आणि देशाबाहेरील नाट्यसंस्था यांना, हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी दोन वेगवेगळी ऑनलाइन केंद्रे सुरू करण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळेस घोषित केले. तसेच राज्यात यापूर्वी फक्त दोन नाट्यविषयक प्रशिक्षणे आयोजित केली जात होती, त्यांची संख्या आता १२ करण्यात आल्याचेही मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले आहे. बालनाट्य स्पर्धेची व्याप्ती वाढविण्यासाठी आणि राज्यस्तरीय स्पर्धेत त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी धोरण निश्चित करण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. याखेरीज नाट्यस्पर्धेतील पारितोषिक रक्कम वाढविणे, परीक्षकांचे मानधन वाढविणे यांचाही प्राधान्याने विचार करणार असल्याचे श्री मुनगंटीवार म्हणाले. समाज आणि देशाला दिशा देणाऱ्या छ. शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, छ शाहू महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर



यांच्यासारख्या महामानवांवर महानाट्ये करण्याचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी जाहिर केले. दुर्मीळ नाटकाच्या संहिता जपणे व त्या नाटकांचे रंगमंचावर चित्रीकरण करून त्यांचे जतन करण्याबाबतही निर्णय झाल्याची माहिती त्यांनी दिली. यंदाच्या वर्षापासून राज्यातील स्थानिक बोलीभाषेतील एकांकिका स्पर्धा व महोत्सव सुरू करण्याचा मानसही श्री. मुनगंटीवार यांनी जाहीर केला.

सांस्कृतिक विभागाचे वार्षिक कार्यक्रम वेळापत्रक तयार करण्यात येत असल्याने, कलावंत आणि त्यांच्या संस्था यांना योग्य वार्षिक नियोजन करता येईल व त्यातून दर्जेदार निर्मिती प्रेक्षकापर्यन्त पोहोचेल असे ते म्हणाले. सांस्कृतिक कार्य मंत्री म्हणाले की, "इकॉनॉमिक ग्रोथ" तर हवीच, सोबत "हॅप्पीनेस इंडेक्स " वाढावा यासाठी सांस्कृतिक विभागाची जबाबदारी महत्वाची आहे.